


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८१ ■ सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## मोहन भागवतांच्या सुरक्षेचा खर्च सरकारवर का ?

**मुंबई:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि त्यांचे सरसंघचालक मोहन भागवत यांना दिल्या जाणाऱ्या झेड प्लस दर्जाच्या सुरक्षेवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या सुरक्षेसाठी होणारा खर्च सरकारी तिजोरीतून केला जात असल्याने तो संबंधित व्यक्तीकडूनच वसूल करावा, अशी मागणी करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेमुळे राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर चर्चा सुरू झाली आहे.

# महिला आरक्षण विधेयक 2029 मध्ये लागू होईल -देवेंद्र फडणवीस



प्रतिनिधी २० एप्रिल

**मुंबई :** देशातील सामाजिक आणि आर्थिक बाबतीत महत्त्वाचा देश ठरेल, अशी १७ एप्रिलला अपेक्षा होती. महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर होणार होतं. सर्वजण मदत करतील याला अपेक्षा होती. मात्र डीएमके, एनसीपी शप, समाजवादी, उबाठा , काँग्रेस यांनी महिला मानसिकतेचे प्रदर्शन केलं, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. लोकसभेत महिला आरक्षण विधेयक रद्द झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे,शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे, मंत्री मेघना बोर्डीकर, मंत्री आदिती तटकरे, भाजपच्या आमदार चित्रा वाघ, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित होते.

महिला विधेयकाची विरोधकांकडून भ्रूणहत्या करण्यात आली. आनंदोत्सव देखील त्यानंतर साजरा केला. हे समाजसुधारकांच्या विचारांवर केलेले तांडव होते. महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जन्मशताब्दी सुरु आहे. परंतु महात्मा ज्योतिबा फुलेंच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम झाले. हे सगळे पक्ष एक्सपोज झाली आहेत, अशी टीका देवेंद्र फडणवीसांनी केली. लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू झाला आहे, हत्यारे विरोधी पक्ष आहेत, असा घणाघातही देवेंद्र फडणवीसांनी केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १९७६ ला देशात डिलिमिटेशन झालं. संविधान संशोधन करत १९७१ ची लोकसंख्या फ्रीज ठेवत २००० सालापर्यंत डिलिमिटेशन होणार नाही, असा निर्णय झाला. २००२ साली कमिशन तयार झालं, तेव्हा दक्षिणेवर अन्याय होऊ नये म्हणून २००२ साली २० वर्षांची वाढ दिली. ७१ सालच्या लोकसंख्येवर डिलिमिटेशन झालं. २०२३ साली महिला आरक्षणासाठी संशोधन झालं तेव्हा सेन्सस आणि डिलिमिटेशन लागू करत संशोधन झालं. २०२३ च्या संविधान संशोधनानुसार ही विधेयकं आलीत. सगळी आकडेवारी येईपर्यंत २०२८ उजाडेल. २०२३ ला निर्णय घेतला होता, त्यानुसार डिलिमिटेशन करायचं आणि कुठल्याही परिस्थितीत २०२९ ला महिला आरक्षण लागू होईल आणि महिला निवडून येतील.

### लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू

लोकसभेत ५४३ जागा भारताच्या संसदेत असतील, असं १९७१ साली ठरलं होतं. तेव्हा लोकसंख्या ४५ कोटी होती आणि आता १४० कोटी लोकसंख्या आहे. पिपल्स रिप्रेशेन्टेशन ॲक्टसोबत प्रतारणा होईल. उत्तर आणि दक्षिण वाद संपवण्याचे प्रयत्न या विधेयकात केले होते. लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू झाला आहे, हत्यारे विरोधी पक्ष आहेत. नेहमीच काँग्रेस आणि साथीदारांची अशी प्रवृत्ती राहिली आहे. त्यांनी सातत्याने महिला विरोधी धोरणं घेतली, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.

### राज्यातून १ कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार

आम्ही आता महिलांचे एकत्रीकरण करणार आहोत. लोकशाहीत जनमताचा रेटा यांच्या लक्षात येईल. तेव्हा हे महिला आरक्षणाला पाठिंबा देतील. महिलांना संघटित करण्याचे काम करु. राज्यातून १ कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार आहोत, जनजागृती करणार आहोत. आम्ही मेळावा बोलावला आहे. तिथे देखील आमच्या मित्र पक्षांना निमंत्रित करु. उबाठा, राष्ट्रवादी शप, आणि काँग्रेसचा महिला विरोधी चेहरा आम्ही उघड करु. महिलांना आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे देखील ते म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांची राहुल गांधींवर टीका

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, खरं म्हणजे एखादा व्यक्ती किती खोटं बोलू शकतो, याचं जर ऑलिम्पिक घेतलं, तर राहुल गांधींशिवाय दुसऱ्याला मेडल मिळूच शकत नाही, सगळी गोल्ड मेडल राहुल गांधींनाच मिळतील. राहुल गांधी यांचा महिलांचा अपमान आणि इतर घटकांचा अपमान करणं हा छंद आहे, अशी टीका त्यांनी राहुल गांधींवर केली. प्रियांका गांधी यांनी केलेल्या आरोपाबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी त्यांना दोष देणार नाही, त्या नवीन आहेत. त्या २०२३ नंतर आल्या आहेत. आपण २०२३ साली महिला आरक्षण विधेयक मंजूर केलं तेव्हा डिलिमिटेशन आणि महिला आरक्षण लागू होऊ शकत नव्हतं. प्रियांका गांधी यांना कदाचित हे समजावून सांगितलं नसेल.

# डमरू वाजवून कोणाला फसवताय

## संजय राऊतांची मुख्यमंत्री फडणवीसांवर टिका

प्रतिनिधी २० एप्रिल



**मुंबई:** पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांसारख्या संवैधानिक पदांवर बसलेल्या व्यक्तींनी जनतेशी सत्य बोलण्याची शपथ घेतलेली असते. मात्र, महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर सत्ताधारी सातत्याने जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केला आहे. '२०२३ मध्येच संसदेत नारी शक्ती अधिनियम मंजूर झाला आणि १६ एप्रिल रोजी त्याची अधिसूचनाही निघाली, मग आता पुन्हा या नावाचा डमरू वाजवून कोणाला फसवताय?' असा संतप्त सवाल राऊत यांनी उपस्थित केला.

संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २० सप्टेंबर २०२३ च्या एका जुन्या ट्वीटचा संदर्भ दिला. 'दीड वर्षांपूर्वी ज्या विधेयकाचे स्वागत फडणवीसांनी 'ऐतिहासिक पाऊल' म्हणून केले होते, त्याच मुद्द्यावरून आता पुन्हा आंदोलन किंवा निषेध करणे हा महाराष्ट्राच्या जनतेचा अपमान आहे. मुख्यमंत्र्यांनी आणि फडणवीसांनी आपल्या दुटप्पी भूमिकेबद्दल आणि खोट्या प्रचाराबद्दल देशाची माफी मागावी,' अशी मागणी संजय राऊत यांनी यावेळी केली.

## अडीच वर्षे झाली, तरी बिलाची अंमलबजावणी का नाही

**मुंबई:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्यावरून विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला होता. त्यांच्या टीकेला आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेत घेत जोरदार प्रत्युत्तर दिले. '२०२३ मध्ये हे बिल मंजूर झाले आणि आता आपण २०२६ मध्ये आहोत. अडीच-तीन वर्षे उलटूनही महिलांना अद्याप ३३ टक्के आरक्षण का मिळाले नाही?' असा रोखठोक सवाल त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महिला आरक्षणाचे बिल एकमताने संसदेने पास केलेले आहे. त्याची अंमलबजावणी २०२४ च्या लोकसभेत करणे आम्हाला अपेक्षित होते आणि आजही विनम्र विनंती करते की, या क्षणी तुम्ही अंमलबजावणी करा. ५४३ मधील ३३ टक्के महिलांना लगेच आरक्षण द्या. आम्ही पूर्ण त्यासाठी तयार आहोत. हे कालच करायला पाहिजे होते.सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'हे बिल प्रत्यक्षात महिला आरक्षणाचे नव्हतेच, तर ते 'डिलिमिटेशन'चे (मतदारसंघ पुनर्रचना) बिल होते. नारीशक्तीला ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी जे घटनात्मक बदल करायचे होते, ते आम्ही तीन वर्षांपूर्वीच एकमताने केले आहेत. मग आता पुन्हा त्यावर चर्चा कसली? सरकारने अंमलबजावणीत टाळाटाळ का केली? डिलिमिटेशन आणि महिला आरक्षणाचा संबंध काय? अधिवेशन आधी अनेक गोष्टी आम्हाला सांगण्यात आल्या, मग त्या विधेयकात का आल्या नाहीत? त्यामुळे महिला आरक्षणाच्या विरोधाचा विषय येतोच कुठे? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला.सुप्रिया सुळे म्हणाल्या, मुख्यमंत्री संसदेतील चर्चासत्रात नव्हते. विधेयकात झालेले दोन तीन बदल झालेले आहेत. ही क्रोनोलॉजी माहीत असली पाहिजे. त्यावेळेस असे ठरले होते, डिलिमिटेशन आणि सेन्सेस या दोन्ही गोष्टी याची चर्चा त्या बिलामध्ये आहे. पण सेन्सेस कुठला? जो येईल तो. मग भारत सरकारने शब्द दिला होता की, सेन्सेस करणार. त्यानंतर मागणी झाली की, जातीय जनगणना करा.

## ढगाळ वातावरण उकाड्यात घट हवामानात मोठा बदल संभवतो

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला** विदर्भात २०, २१ आणि २२ एप्रिल रोजी काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. हा पाऊस 'हाहाकार' माजवणारा नसून केवळ स्थानिक वातावरणातील बदलामुळे होणारा बदल आहे.

गेल्या काही दिवसांपासून उष्णतेच्या लाटेने अकोलेकर नाही तर संपुर्ण पश्चिम विदर्भ होरपळत असताना नागरिकांना दिलासा देणारे वृत्त मिळाले आहे. विदर्भात २०, २१ आणि २२ एप्रिल रोजी काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस ढगाळ वातावरणाने तापमानात घट संभवते. पण, पावसानंतर पुन्हा उकाडा वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे. सोमवार, २० एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता नागपूर येथील हवामान खात्याने व्यक्त केली आहे. त्याच बरोबर पुढील काही दिवस ढगाळ वातारवण कायम राहणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## अकोला रेल्वे स्थानकावर थंड पाण्यासाठी वणवण

प्रतिनिधी २० एप्रिल



**अकोला:** ४४ अंश तापमानात अकोला रेल्वे स्थानकावर थंड पाणी उपलब्ध नसल्याने प्रवाशांना पाणी विकत घेण्याशिवाय पर्याय नाही. कुलिंग यंत्रणेद्वारे रास्त दरात पाणी मिळत होते ते बंद आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक १ ते सहा पर्यंत ही समस्या निर्माण झाल्याची धक्कादायक माहिती आहे.

एकीकडे थंड पाणी नाही आणि उपलब्ध गरम पाणी पिणे अशक्य आहे. यामुळे प्रवाशांना थंड पाणी मिळत नाही. त्यामुळे पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत आहे. या पूर्वी उन्हाळ्यात प्रवाशांची सोय व्हावी म्हणून थंड पाणी उपलब्ध करून देत होते. परंतु सध्या ते देखील मिळत नाही. पाणी समस्या सोडविण्यासाठी रेल्वे स्थानक प्रशासनाने त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. कारण अकोला रेल्वे स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी देशाच्या विविध भागात जातात आणि २० रूपये खर्च करून विकत घेण्याची प्रत्येकाची ऐपत नसते. तसेच उन्हाळा लक्षात घेऊन थंड पाणी उपलब्ध करून देणे ही रेल्वे प्रशासनाची जबाबदारी आहे. या बाबतीत आधीच आढावा घेतला असता तर अडचण निर्माण झाली नसती. परंतु सद्यस्थिती विषयी प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत.

## मुलाने पित्याची हत्या केल्याच्या घटनेत आरोपीस दोन तासाच्या आत अटक

प्रतिनिधी २० एप्रिल


**हिवरखेड.** मुलाने वडिलांचा खून केल्याची धक्कादायक घटना २० एप्रिल रोजी सकाळी घडली. पोलिसांनी आरोपीस दोन तासाच्या आत अटक केली. ठाणेदार गजानन राठोड यांना सोमवारी सकाळी ०७.०० वाजताचे दरम्यान फोनव्दारे माहिती मिळाली की, आरोपी दीपक चतुरकार याने त्याचे वडील रामदास सहदेवराव चतुरकार यांच्या डोक्यात लोखंडी रॉड मारुन ठार केले. आरोपी दीपक फरार झाला. अशी माहिती मिळाल्यावरुन पोलीस घटनास्थळी पोहोचले. उपनिरीक्षक गोपाल गिलबिले, पोहेकों प्रफुल पवार, पोहेकॉ प्रमोद चव्हाण यांचे एक पथक रवाना करण्यात आले. आरोपी हा दहिगांव फाटा ते पंचगव्हाण फाटा येथुन पळून जात असताना त्यास ०२ तासाच्या आत ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन हिवरखेड येथे आणले.या प्रकणामध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय अधिकारी निखील पाटील यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार गजानन राठोड हे करीत आहेत.

## आज सूरत, उद्या मुंबई-पुणे ? रोहिणी खडसे आक्रमक

**मुंबई:** गुजरातमधील सूरत शहरात निर्माण झालेल्या गॅस टंचाईच्या गंभीर परिस्थितीचा परिणाम आता मोठ्या प्रमाणावर दिसू लागला असून, त्यावरून महाराष्ट्रातही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी या पार्श्वभूमीवर राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे. मिडल-ईस्टमधील युद्धामुळे निर्माण झालेल्या एलपीजी संकटाचा फटका भारतातील अनेक भागांना बसत असून, सूरतमध्ये त्याचे तीव्र परिणाम दिसून येत आहेत.

# निविदा प्रक्रियेत कंत्राटदारांना मोठा दिलासा

## ◆ उच्च न्यायालयाकडून 'पूर्व उल्लंघन' संकल्पनेची व्याप्ती स्पष्ट



प्रतिनिधी २० एप्रिल

**नागपूर :** शासकीय निविदा प्रक्रियेत कंत्राटदारांना अपात्र ठरवताना वापरल्या जाणाऱ्या 'पूर्व उल्लंघन' या संकल्पनेबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पत्राच्या आधारे कंत्राटदाराला शासकीय निविदेतून अपात्र ठरवणे बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

RRC CONSTRUCTION

या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय विभाग यांच्यातील फरक अधोरेखित झाला असून, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता व न्याय्यतेचा सिद्धांत पुन्हा प्रस्थापित झाला आहे.या प्रकरणात राजराजेश्वर कन्स्ट्रक्शनच्या वतीने ज्येष्ठ अधिवक्ता कप्तान सर, ॲड. धर्माधिकारी आणि ॲड. गौरांग भाके यांनी बाजू मांडली. या निकालामुळे राज्यातील अनेक कंत्राटदारांना कायदेशीर संरक्षण आणि दिलासा मिळाला आहे.

**नेमके प्रकरण काय ?**
अकोला येथील राजराजेश्वर कन्स्ट्रक्शन या संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'वन भवन' इमारत बांधकामाच्या निविदेत सहभाग घेतला होता. मात्र, एका महानगरपालिकेने दिलेल्या पत्राचा आधार घेत, या संस्थेने पूर्वीच्या कामात त्रुटी ठेवल्याचा ठपका ठेवून 'इंटिग्रिटी पॅक्ट'च्या उल्लंघनाखाली त्यांना अपात्र ठरवण्यात आले होते.न्यायालयाचा युक्तिवाद आणि निर्णय या प्रकरणावर सुनावणी दरम्यान महत्त्वाचे कायदेशीर मुद्दे समोर आले.

**राज्य सरकारचा पक्ष:** अर्जदाराने पूर्व उल्लंघनाची माहिती लपवली असून महानगरपालिकेच्या पत्राच्या आधारे केलेली अपात्रता योग्य आहे, असा युक्तिवाद सरकारी पक्षाने केला.

**अर्जदाराचा युक्तिवाद:** महानगरपालिका ही 'शासकीय विभाग' किंवा 'सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम' नसून ती एक स्थानिक स्वराज्य संस्था आहे, त्यामुळे तिने दिलेल्या पत्रावर आधारित अपात्रता ग्राह्य धरता येणार नाही.

**न्यायालयाचे निरीक्षण:** न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला. 'इंटिग्रिटी पॅक्ट'नुसार 'पूर्व उल्लंघन' हे केवळ शासकीय विभाग किंवा सार्वजनिक उपक्रमांशी संबंधित कामांबाबतच लागू होऊ शकते. महानगरपालिकेच्या कामांमधील कथित त्रुटी या संज्ञेत मोडत नाहीत.

**बांधकाम विभागाचे प्रतिज्ञापत्र :** भविष्यातील निविदांवर परिणाम नाही सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून स्पष्ट केले की, संबंधित महानगरपालिकेच्या शिफारसीनुसार अर्जदार संस्थेला काळ्या यादीत टाकले जाणार नाही किंवा भविष्यातील कोणत्याही निविदा प्रक्रियेपासून वंचित ठेवले जाणार नाही.

## जम्मू-उधमपूरमध्ये अपघातात १६ जणांचा मृत्यू

**उधमपूर:** सोमवारी सकाळी जम्मूच्या उधमपूरमध्ये एका बसचा अपघात झाला. रामनगरहून येणारी बस जालोजवळ रस्त्यावरून १०० फूट खाली कोसळून उलटली. या अपघातात सोळा जणांचा मृत्यू झाला असून, २० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

## अमेरिकेचा चीनमधून येणाऱ्या इराणी जहाजावर ताबा

**तेहरान:** अमेरिकेने इराणच्या एका मालवाहू जहाजाला ताब्यात घेतले आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या मते, टॉस्का नावाचे हे जहाज होर्मुज सामुद्रधुनी पार करण्याचा प्रयत्न करत होते. त्याला अमेरिकन डेस्ट्रॉयर स्प्रूअन्सने रोखले.ट्रम्प यांच्या मते, जहाजाने इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले, त्यानंतर अमेरिकन मरीनने त्याला थांबवले. त्यांनी सोशल मीडियावर लिहिले, 'या क्षणी जहाज आमच्या ताब्यात आहे. आम्ही ते पूर्णपणे नियंत्रणात घेऊन आत काय आहे ते तपासत आहोत.'

दुसरीकडे, इराणच्या हजरत खातम अल-अनबिया लष्करी मुख्यालयाने सांगितले की, अमेरिकेने युद्धविरामाचे उल्लंघन केले आणि ओमानच्या आखातात इराणच्या एका व्यापारी जहाजावर गोळीबार केला, ज्यामुळे त्याची नेव्हिगेशन प्रणाली खराब झाली.तस्नीम मीडियानुसार, हे जहाज चीनमधून इराणकडे जात होते. इराणने याला समुद्री चाचेगिरी म्हटले आणि सांगितले की ते लवकरच याला प्रत्युत्तर देतील. इराणने होर्मुझमध्ये २ भारतीय जहाजांवर गोळीबार केला. १४ जहाजे थांबवण्यात आली, १३ परतली. भारताने राजदूताला बोलावून निषेध नोंदवला. इराणने अमेरिकेवर युद्धबंदी उल्लंघनाचा आरोप करत सामुद्रधुनी पुन्हा बंद केली.

## ८ आरोपी अटकेत, ८ पीडित मुलींचे १८ व्हिडिओ जप्त

प्रतिनिधी २० एप्रिल



**अमरावती :** परतवाडा पोलीस स्टेशन हद्दीत काही मुलींचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी अयान अहमद तनवीर अहमद (वय १९, रा. परतवाडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस तपासात आरोपीकडून मोबाईल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये ८ पीडित मुलींचे १८ व्हिडिओ आणि ३९ फोटो आढळून आले. या प्रकरणात सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करणारे आणखी ७ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांनाही अटक करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अशी माहिती पत्र परिषद मध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिली. तपासादरम्यान एका १५ वर्षीय पीडितेने पोलिसांसमोर बयान देण्यास सहमती दर्शवली असून महिला पोलीस अधिकारी आणि महिला व बाल कल्याण अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तिचे बयान नोंदविण्यात आले आहे.

दरम्यान, आरोपी उजेर खान इकबाल खान (वय २०, रा. परतवाडा) याच्याविरुद्धही स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो एका १६ वर्षीय मुलीच्या संपर्कात होता. या प्रकरणात आतापर्यंत ०५ मोबाईल न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून, आणखी ०६ मोबाईल, ०१ लॅपटॉप, ०१ टॅब आणि ०१ हार्ड डिस्क तपासासाठी पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पोलीस प्रशासनाने इतर संभाव्य पीडितांना आवाहन केले आहे की, कोणत्याही भीतीशिवाय पुढे येऊन आपले बयान नोंदवावे.

CMYK CMYK

# उन्हाळ्यातील आहार आणि त्याचे महत्व

उष्णतेचा पारा आता वाढत चाललेला आहे. मार्चमध्ये अल्हाददायक गारवा कमी होत जातो. तसे तापमान वाढू लागते. बाहेरच्या वाढत्या तापमानाचा आपल्या शरीरावर परिणाम दिसू लागतो उन्हाळयापूर्वी थंडीत आपली पचनशक्ती चांगली असते त्यामुळे उष्ण ,जड पदार्थ या मोसमात आहारात सहज पचतात. पण याउलट उन्हाळयात शरीराची पचनशक्ती फार चांगली नसते या काळात डीहायड्रेशन ,पित्त, अपचन, डोकेदुखी अशा अनेक समस्या जाणवतात. त्यामुळे उन्हाचा कडाका वाढला की आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.



मानवी शरीर सरासरी ६० ते ७० ज्ञ् हे पाण्याने बनलेले आहे. उन्हाळ्यामध्ये किंवा काम करताना घामावाटे शरीरातील पाण्याची पातळी कमी होते शिवाय त्यासोबतच शरीरातील क्षारांचे संतुलन बिघडू शकते. शरीराचे तापमान व एकूणच आतील सर्व संस्था व्यवस्थित ठेवण्यासाठी द्रव्य स्वरूपात केलेल्या सेवन जास्त फायद्याची ठरते. उन्हाळ्यात निसर्गाकडून आपल्याला अशी फळे मिळतात ज्यात पाण्याचे प्रमाण भरपूर असते त्यामुळे ही फळे या ऋतूत अवश्य खावीत जसे कलिंगड आणि टरबूज यात पाण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे ते शरीराला हायड्रेट ठेवून खनिजे व जीवनसत्वे प्रदान करते. याशिवाय संत्री ,द्राक्षे, पपई इत्यादी फळे ही चांगली. काकडी शरीरातील उष्णता कमी करण्यास मदत करते त्यामुळे दुपारच्या जेवणात दही घालून काकडीची कोशिंबीर अवश्य घ्यावी. पालक मेथी पुदिना यासारख्या पालेभाज्या दुधी भोपळा, तोडली, पडवळ, कारले यासारख्या पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या भाज्या खाव्यात. उन्हाळ्यात दुपारी जेवणात हिरव्या चटण्यांचे सेवन करावे म्हणजे कोथिंबीर ,पुदिना ,आवळा , कढीपत्ता, कांदा इत्यादींच्या चटणी घ्यावी. तसेच दुपारच्या जेवणात डाळ ,भात ,भाकरी, भाजी, कोशिंबीर किंवा सलाद अवश्य घ्यावे. दहीभात घेतल्यास उत्तम. दह्याचे सेवन पोटासाठी उत्तम असते. सकाळच्या नाश्त्यामध्ये आंबील, उपीट, दही पोहे, नाचणी सत्व असे हलके पदार्थ देखील घेऊ शकता. संध्याकाळी नाश्ता मध्ये मुरमुरे भेळ कांदा टोमॅटो काकडी टाकून केलेली याशिवाय लिंबू पाणी, ताक, कोकम सरबत ,पन्हे ,आवळा, सरबत , नारळ पाणी बहुउपयोगी आहेत. त्यासोबत दररोज आठ ते दहा ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. साधे पाणी जात नसेल तर वरील प्रमाणे द्रव्य पदार्थ घेऊ शकता(नारळ पाणी, लिंबू पाणी, ताक) शक्यतोवर फ्रिजचे पाणी पिण्यापेक्षा मातीच्या रांजणातील पाणी प्यावे.

दुपारच्या वेळी उन्हात जाणे टाळावे शिवाय काही उष्मघाताची लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. व चहा व कॉफी व गरम पेय या दिवसात घेणे टाळावे. बाहेरील अति थंड पेय, अति साखरयुक्त पदार्थ टाळावे. जड तेलकट अति मसालेदार पदार्थ टाळावी. असे छोटे छोटे उपाय करून उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घ्यावी.

अंजली वाघ
आहारतज्ञ उपजिल्हा रुग्णालय मुर्तीजापुर

# २० - २२ एप्रिल दरम्यान राज्यात वादळी पावसाची शक्यता

**मुंबई:** पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल.

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी:

- शेतकऱ्यांनी शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत
- ष्काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत किंवा ताडपत्री/झाकणाने सुरक्षित ठेवावीत
- वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी
- शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन मोकळ्यावर ठेवू नये

# चंचल पितांबरवाले यांना 'राज्यस्तरीय महिला रत्न पुरस्कार २०२६' जाहीर

अकोट विचारांना कृतीची जोड देत समाजघडणीचा ध्यास घेतलेल्या तरुण पिढीतून उगवलेले एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे कु. चंचल सुनिल पितांबरवाले. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत युवा विचारपीठ प्रतिष्ठान, अकोला यांच्या वतीने देण्यात येणारा 'राज्यस्तरीय कर्तृत्व शिखर महिला रत्न पुरस्कार '२०२६ त्यांना जाहीर झाला आहे. त्यामुळे अकोट शहराच्या मानात अभिमानाची भर पडली असून सर्वत्र त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक युगात केवळ घोषणांनी नव्हे तर कृतीतून मूल्य जपणाऱ्यांची खरी गरज असते. हाच विचार मनाशी बाळगत युवा विचारपीठ प्रतिष्ठानने ङ्गचला माणूस घडवूयाङ्ग हा उपक्रम हाती घेतला आहे. 'विश्व स्नेह का ध्यान धरे, सब का सब सम्मान करे' या मानवतावादी विचारसरणीवर आधारित ही चळवळ जात, धर्म, पंथ यांच्या भिंती ओलांडत माणुसकीचा सेतू उभारण्याचे कार्य करत आहे.याच सामाजिक ध्येयातून दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जातो. यंदाचा बहुमान कु. चंचल पितांबरवाले यांना जाहीर होणे म्हणजे त्यांच्या



निःस्वार्थ सेवाभावाची आणि समाजासाठीच्या समर्पित कार्याची पावतीच आहे. त्यांनी समाजात जागृती, महिला सक्षमीकरण आणि मानवतावादी मूल्यांच्या जपणुकीसाठी केलेले कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

हा भव्य पुरस्कार सोहळा दि. १८ एप्रिल २०२६, शनिवार, सायं. ५ ते ९ या वेळेत अकोला येथील प्रमिलाताई ओक हॉल येथे पार पडणार आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात येणार असून, त्यांच्या कर्तृत्वाला समाजमान्यता देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.युवा विचारपीठ प्रतिष्ठान वर्षभर सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबवत समाज परिवर्तनाची दिशा देत आहे. विचारांच्या देवाणघेवाणीतून कर्तृत्व घडविणे आणि त्या कर्तृत्वातून समाज अधिक सक्षम व समृद्ध करणे, हा संस्थेचा मूळ हेतू आहे. या कार्यात संस्थेचे अध्यक्ष प्रा. निलेश ठाकरे, उपाध्यक्ष सौ. स्मिता राजेश अग्रवाल तसेच सर्व समन्वयक-समन्वयिका यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

कु. चंचल पितांबरवाले यांच्या या यशामुळे अकोट शहराच्या सामाजिक वाटचालीत नवा आत्मविश्वास निर्माण झाला असून, त्यांच्या कर्तृत्वाची ही झेप अनेक तरुणींना प्रेरणा देणारी ठरत आहे. समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द आणि विचारांना कृतीत उतरविण्याची ताकद असेल, तर यश आपोआपच पायाशी येते-याचा प्रत्यय त्यांच्या कार्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

# 'एआय ' मुळे युवकांच्या नोकऱ्यांवर गंडांतर

ओरॅकल कॉर्पोरेशन, जी अमेरिकेतील एक प्रमुख बहुराष्ट्रीय संगणक तंत्रज्ञान कंपनी आहे, तिने जगभरातील अंदाजे ३०,००० पदे अशातच कमी केलीत. त्यामुळे १२,००० भारतीयांच्या नोकऱ्यांवर गदा येणार आहे. उद्योगातील अग्रगण्य कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी एआय डेटा सेंटर्स आणि क्लाऊड कंप्यूटिंगच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या मोठ्या भांडवली खर्चामुळे ही कर्मचारी कपात करण्यात आल्याचे सांगितले गेले. कंपनीचा खार्च मोठ्या प्रमाणातएआयकडे वळत असताना, ३० हजार कर्मचाऱ्यांची कपात केल्याने ८ ते १० अब्ज डॉलर्सची (अंदाजे ७५,००० ते ९०,००० कोटी रुपये) बचत होण्याची संभावना आहे. कंपन्या आता मनुष्यबळापेक्षा तंत्रज्ञानावर जास्त गुंतवणूक करत आहेत, ज्यामुळे कर्मचाऱ्याऱ्यांमध्ये अस्थिरतेची भावना आहे.

मे २०२५ मध्ये, डारियो अमोडेई, जे एक अमेरिकन एआय । कृत्रिम बुद्धिमत्ता) संशोधक संशोधक आणि उद्योजक आहेत व अँथ्रोपिक या एआय कंपनीचे सीईओ आहेत, त्यांनी सूचित केले की एआयमुळे पुढील एक ते पाच वर्षात बेरोजगारी १० ते २० टक्क्यांनी वाढू शकते आणि सर्व एंट्री-लेव्हल व्हाईट-कॉलर नोकऱ्यांपैकी निम्म्या नोकऱ्या नाहीशा होऊ शकतात. याचे प्रतिबिंब आपल्याला २०२५ मध्ये दिसून आले. सन २०२५ मध्ये मायक्रोसॉफ्टने ९०००, इंटेलने २१,०००, अ?क्सेन्चरने ११,०००, अ?मेझॉनने १६,०००,



टीसीएसने १२,०००, ओरॅकलने ३०,०००, अशा एकूण २,४५,९६३ संगणक सेवकांना कामावरून कमी केले.

२०२६ च्या पहिल्या तीन महिन्यांत ८५,१५६ लोकांना नोकरी गमवावी लागली, म्हणजे दररोज जवळपास १००० लोकांना नोकरी गमवावी लागली, मग काय एआय बहुतांश नोकऱ्यांची जागा घेईल?

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान माहिती आणि तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील प्रगतीतूनच निर्माण झाले; पण त्यामुळे पारंपरिक आयटी नोकऱ्यांच्या स्वरूपात मोठी उलथापालथ झाली आहे. आयटीमधील अनेक कामे करण्यासाठी कुशल तंत्रज्ञ लागत होते. एखादे काम करण्यासाठी, अनेक माणसे नेमून, लाखो रुपये खर्च करावा लागत होताः पणआता 'एआय' ही कामे चुटकी सरशी करत आहे. जे काम करायलाआधी १० लोकलागावाचे, ते आता एआयच्या मदतीने २-३ लोक करू शकतात. यामुळे जुन्या पद्धतीच्या नोकऱ्या कमी झाल्या आहेत. मुख्यत्वे, एंट्री-लेव्हल कोडिंग, टेस्टिंग आणि मॅन्युअल डेटा एंट्री यांसारख्या कामांवर वाचा मोठा परिणाम झाला आहे.

सध्या अंथ्रोपिक कंपनीचे 'क्लॉड' हे मॉडेल लोकप्रिय झाले आहे. या मॉडेलचा वापर करून कंपनीने 'क्लॉड कोड' व 'क्लॉड कोवर्क' ही उत्पादने बाजारात आणली आहे. 'क्लॉड कोड' चा वापर करून सॉफ्टवेअर क्षेत्रातील काहीही माहीत नसलेला माणूस सुद्धा अगदी अद्ययावत सॉफ्टवेअर प्रकल्प काही मिनिटात तयार करू शकतो. यामुळे प्रोग्रामरची गरज भविष्यात लागेल का? हे आता सांगणे कठीण आहे. क्लॉड कोवर्क मुळे कार्यालयांमधील बहुविध कामे स्वयंचालित करून टाकलीत.

अंथ्रोपिक कंपनीचे नवीन एआय टूल इतके शक्तिशाली आहे, की ते सॉफ्टवेअर कंपन्या करत असलेली बहुतांश कामे करू शकते. संपूर्ण बिझनेस

वर्कफ्लो (कार्यप्रवाह म्हणजे कार्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या क्रियाकलापांची मालिका) हाताळण्यासाठी याची रचना करण्यात आली आहे.

अंथ्रोपिकची साधने (टूल्स) कोणती कामे करू शकतात?ः कार्यस्थळ स्वयंचलन साधनामुळे (वर्कप्लेस ऑटोमेशन टूल्स) सॉफ्टवेअर वापरताना कर्मचाऱ्यांना मदत करण्याऐवजी एआय स्वता संपूर्ण व्यवसाय प्रक्रिया पूर्ण करू शकते. यामध्ये कायदेशीर कागदपत्रांची तपासणी, अनुपालन तपासणी, विक्री नियोजन, विपणन (मार्केटिंग। मोहिमेचे विश्लेषण, आर्थिक ताळमेळ, डेटाचे दृश्य सादरीकरण (व्हिज्युअलायझेशन), स्ट्रक्चर्ड ज्वेरी लैंग्वेजचा (एसक्यूएल) वापर करून डेटाबेसमधून माहिती मिळवणे आणि त्याचे विश्लेषण करून अहवाल तयार करणे आणि उपक्रम स्तरावरील दस्तऐवजांचा शोध यांसारख्या कामांचा समावेश आहे. आता आयटी कंपन्यांत, ज्या कामांसाठी पूर्वी वेगवेगळ्या सॉफ्टवेअर सबस्क्रिप्शनची गरज भासायची, ती सर्व कामे आला एकाच एआय-आधारित वातावरणात पूर्ण केली जाऊ शकतील. त्यामुळे निश्चितच कर्मचाऱ्यांची संख्या कमी होऊ शकते.

मग काय आता तरुणांना नोकरीच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध असतील? याचे उत्तर नाही असे आहे. एआयमुळे पारंपरिक आयटी नोकऱ्यांच्या स्वरूपात मोठी उलथापालथ होत आहे. 'एआय आगमनाने नोकऱ्यांचे स्वरूप बदलेल, कर्मचारी आता स्वतः काम करण्याऐवजी एआयने केलेल्या कामाचे निरीक्षण आणि पडताळणी करण्याची भूमिका बजावतील, नियमित काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा प्रणाली आराखडाकार (सिस्टम डिझाइनर्स), कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षक (एआय ट्रेनर्स) आणि धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या तज्ज्ञांची मागणी वाढेल.

एआयमुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचल्यास, कंपनी त्यांना अधिक कल्पक आणि धोरणात्मक कामांमध्ये गुंतवू शकते. त्यामुळे उत्पादकता वाढेल. बऱ्याच ठिकाणी, एआयमुळे कामाची व्याप्ती वाढून, कामे कमी होण्याऐवजी ती वाढू शकतात, ज्यामुळे कर्मचारी पूर्वीपेक्षा जास्त व्यस्त राहू शकतात व अधिक कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासू शकते. आता नव्या कौशल्यांची गरज भासणार आहे.

आता फक्त कोडिंग (संगणकाला विशिष्ट कार्य करण्यासाठी संगणक भाषांच्या (प्रोग्रॅमिंग लैंग्वेज) माध्यमातून सूचना किंवा आज्ञा लिहिणे) घेऊन चालत नाही, तर एआय प्रॉम्प्ट अभियांत्रिकी, मशीन लर्निंग, आणि डेटा सायन्स यांसारख्या प्रगत कौशल्याची मागणी वाढणार आहे. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या वेगवान एकत्रीकरणात यशस्वीपणे मार्गक्रमण करण्यासाठी, तरुणांनी मानव यंत्र अशी संकरित मानसिकता अंगीकारली पाहिजे. यामध्ये तांत्रिक प्रावीण्य आणि सहानुभूती व चिकित्सक विचार यांसारख्या अनमोल मानवी सामर्थ्यांमध्ये संतुलन साधणे समाविष्ट आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या पारंपरिक पदव्यांपेक्षा कौशल्याला प्राधान्य देणाऱ्या भरतीला अधिकाधिक पसंती देत आहेत, ज्यामुळे विशिष्ट क्षमता अत्यावश्यक बनल्या आहेत. तांत्रिक एआय साक्षरता, व्यावहारिक एआय साधने आणि अद्वितीय मानवी कौशल्ये, जसे भावनिक बुद्धिमत्ता, सहानुभूती, गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्याची क्षमता आणि नैतिक निर्णयक्षमता यांसारखे गुण, जे एआय नक्कल करू शकत नाही, तरुणांनी विकसित करणे आवश्यक आहे.

प्रा. संजय त्रिंबकराव खडक्कार
माजी तज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ मो : ७२७६६१४२६०

## व्यक्ती विशेष

# ज्ञानपीठ विजेते गोपीनाथ मोहांती यांची जयंती



भारतीय साहित्यिकांनी विविध भाषेत लेखन करून लौकिक मिळवला आहे. ओडिसी लेखक गोपीनाथ मोहांती यांचे साहित्य क्षेत्रात भरीव योगदान आहे.

२० एप्रिल १९१४ ते २० ऑगस्ट, १९९१ असा त्यांचा कार्यकाळ राहिला. त्यांना १९९३ साली ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले.

गोपीनाथ मोहांती यांचा जन्म २० एप्रिल १९१४ रोजी ओडिशा राज्यातील कटक जिल्ह्यातील नागबली येथे तर मृत्यू २० ऑगस्ट, १९९१ रोजी सान होजे, कॅलिफोर्निया, अमेरिका येथे झाला. ओडिसी भाषेत त्यांनी समृद्ध लेखन केले. मानवी संवेदना हा त्यांच्या लेखनाचा मुख्य आधार होता. इतकेच नाही त्यांनी अनुभवलेला तत्कालीन ओडिशाचे दर्शन त्यांच्या लेखनातून झाले. गोपीनाथ मोहांती यांच्या साहित्य कृतीचे विविध भाषेत अनुवाद झाले. त्यांची साहित्य संपदा लक्षात घेऊन त्यांना साहित्यातील सर्वोच्च अशा ज्ञानपीठ पुरस्काराने गौरवण्यात आले. १९५५ साली अमृतरा संतना या कादंबरीसाठी राष्ट्रीय पातळीवर त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला.

ओडिसी भाषेत त्यांनी केलेले लेखन तरूण साहित्यिकांना आजही प्रेरणा देते. आपल्या लेखन शैलीचा ठसा गोपीनाथ मोहांती यांनी अमीट ठसा उमटवला आहे.

# दारापूरच्या विद्यार्थ्यांचा मोठा विजय: परीक्षा केंद्र बदलण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयाची स्थगिती

## ४१३ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याला दिलासा; ४६ किमी प्रवासाच्या जाचातून तूर्तास सुटका

**नागपूर/ अमरावती:** दारापूर येथील विक्रमशिला पॉलिटेक्निकमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र बदलून ते ४६ किलोमीटर दूर असलेल्या अमरावती येथील महाविद्यालयात नेण्याच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली आहे. या निर्णयामुळे ऐन उन्हाळ्यात परीक्षेसाठी पायपीट करावी लागणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांमधून आणि पालकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

प्रकरणाचा थोडक्यात पार्श्वभूमी अशी की, विक्रमशिला पॉलिटेक्निक, दारापूर येथील विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र अचानक ७ एप्रिल २०२६ रोजीच्या एका पत्रान्वये बदलून ते तक्षशिला पॉलिटेक्निक, अमरावती येथे करण्यात आले होते. या निर्णयाला आर्यन राजेश इंगळे आणि इतर ४१३ विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ३११७/२०२६ द्वारे आव्हान दिले होते. या प्रकरणावर न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

### विद्यार्थ्यांच्या अडचणींचा विचार

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. ए. डी. मोहगावकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की

**प्रचंड अंतर:** दारापूर ते अमरावती हे अंतर ४६ किलोमीटर असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इतक्या लांब प्रवासासाठी कोणतीही ठोस वाहतूक व्यवस्था उपलब्ध नाही.

**उन्हाळ्याचा त्रास:** सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने इतक्या लांब प्रवास करून परीक्षा देणे विद्यार्थ्यांसाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकवणारे आहे.

**अनपेक्षित बदल:** यापूर्वीच्या अहवालांमध्ये आणि एमएसबीटीईच्या (MSBTE) पत्रांमध्ये परीक्षा दारापूर येथेच घेण्याचे सुचवण्यात आले होते, तरीही अचानक केंद्र बदलण्याचा निर्णय घेण्यात आला.

### व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांमधील वाद

गेल्या एका वर्षापासून विक्रमशिला पॉलिटेक्निकमधील शिक्षक, बिगर-शिक्षक कर्मचारी आणि व्यवस्थापन यांच्यात पगार थकबाकी आणि इतर प्रश्नांवरून वाद सुरू आहे. या अंतर्गत कलहाचा फटका विद्यार्थ्यांना बसू नये, अशी विनंती याचिकेत करण्यात आली होती.

### न्यायालयाचा निर्णय

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, न्यायालयाने ७ एप्रिल २०२६ रोजीच्या केंद्र बदलण्याच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. जोपर्यंत प्रतिवादी पक्ष न्यायालयात हजर होऊन आपली बाजू मांडत नाहीत, तोपर्यंत हा स्थगिती आदेश कायम राहील. न्यायालयाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि एमएसबीटीईसह संबंधित संस्थांना नोटीस बजावली असून पुढील सुनावणी ५ मे २०२६ रोजी निश्चित केली आहे.

या निर्णयामुळे दारापूर परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुसह्य होण्याची चिन्हे आहेत. या निकालाकडे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा. त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अथर्व बाहेती बाल रौप्य पदकाने सन्मानित



**अकोला:** ग्रेटर बॉम्बे साइंस टीचर्स एसोसिएशन द्वारा आयोजित डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा आणि सायंस टॅलेंट सर्च स्पर्धेमध्ये अकोलाच्या कोठारी कॉन्वेंटचा नवव्या वर्गाचा विद्यार्थी अथर्व महेश बाहेती याला बाल वैज्ञानिक, रौप्यपदक तसेच रोख पुरस्काराने मुंबई येथे आयोजित एका कार्यक्रमांमध्ये सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावर सहावी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा घेण्यात येते. या स्पर्धेमध्ये एकूण १ लाख ४ हज़ार ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये एमसीक्यू परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, शोध प्रबंध आणि साक्षात्कार प्रत्यक्ष मुलाखात अशा चार स्तरावर कठिण समजण्यात येणाऱ्या या स्पर्धेमध्ये अथर्व बाहेतीने यांनी यश संपादन केले.

# खैरखेड येथील 100 क्विं. मका तर 30 क्विं. गहू जळून लाखोचे नुकसान

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोट:** खैरखेड गावातील विठ्ठल देवराव खंडेराव यांचे शेत स्मशानभूमीच्या बाजूला असून विद्युत वितरण कंपनी अडगाव अंतर्गत येते. शेतकऱ्याच्या शेतामधील दीड एकर गहू, अडीच एकर मका पेरलेला आहे. गव्हामध्ये विद्युत वाहिनीचे पार्किंग झाल्यामुळे ठिणगी खाली पडली व क्षणाचाही विलंब न करता अग्निने रौद्ररूप धारण केले.

गावकरी गावातुन शेतात पोहोचण्याआधीच शंभर टक्केगहू शेतातील गव्हाचे व मक्याचे पीक पूर्णता कुटारा सहित जळून खाक झाले असताना व दुसऱ्या साईटला अडीचक्कर कापून ठेवलेला मका हवेच्या जोराने तो पण जळून खाक झाला.

गावकरी सैरावैरा आग विझवण्याकरिता शेतातील स्प्रिंकलर पाईप विहिरीमधील पाणी चालू करायच्या



प्रयत्नात होते. अडीच एकर मका जळून धुवा उडाला. महावितरण कंपनीला तक्रारी देऊन सुद्धा कंपनीकडून न्याय मिळाला नाही. तसेच अडगाव उपविभागाला जबाबदार अधिकारी नाही. त्यामुळे शेतकरी अतिशय बिकट अवस्थेमध्ये सापडला आहे. विठ्ठल खंडेराव यांच्या मुलीचे लग्नाला सावकाराकडून व्याज दराने टक्केवारी देऊन अशा परिस्थितीत लग्न करण्याची वेळ आली आहे यांना दोन मुले व एक मुलगी असून आमचे नुकसान केवळ विद्युत वितरण कंपनी आडगावच्या हलगर्जीपणामुळे झाले आहे. त्यामुळे आम्हाला विद्युत वितरण कंपनीच्या कडून माझ्या बहिणीच्या लग्नाआधी आर्थिक मदत न दिल्यास आमच्यावर सामूहिक परिवार मरणाची वेळ ही विद्युत वितरण कंपनीच्या काम चुकार अधिकाऱ्यांनी आणली आहे. जर आम्हाला तात्काळ मदत नाही मिळाली तर अडगाव विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयापुढे आत्मदहन केल्याशिवाय कोणताही पर्याय उरणार नाही असा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे.

अडीच एकर मका दीड एकर गहू महावितरण शेतातील पोल वरून शॉर्टसर्किट मुळे आगीचे गोळे पडले त्यामध्ये जळून सर्व मातीमोल झाले परतावा नमिला मिळाल्यास परिवारासहित उपोषण करू,

**धीरज वि. खंडेराव**, शेतकरी मुलगा

नखंडेराव परिवारावर आत्महत्या करण्याची वेळ या महावितरणने आणली आहे शेतकऱ्याच्या मुलीचे लग्न आहे ऐन या आगीच्या तांडवाने शेतकऱ्याला होत्याचे नव्हते करून टाकले कृषी मंत्री यांनी व महावितरण शेतकऱ्याला तात्काळ न्याय द्यावा.

**सुभाष आखरे**, खैरखेड पोलीस पाटील

भर दिवसा ढवळया लाईन चालू मध्ये हा शॉर्टसर्किटचा प्रकार घडला आहे तरीही महावितरण जबाबदारी घेण्यास टाळाटाळ करत आहे. त्यावर वन्य प्राण्यांचे रात्रीचे व दिवसाच्या हल्ले रात्री १० ते ५ लाईन अशावेळी जीवघेणी काम करून कृषीमंत्री म्हणतात पाठीशी आहोत या शेतकऱ्याला तात्काळ मदत नाही मिळाल्यास आम्ही तीव्र आंदोलन करू.

**किशोर गोमासे**, शेतकरी

## श्रीराम महाराज मेहुणकर जन्मशताब्दी महोत्सव



**अकोला:** श्री स्वयंभू महादेव मंदिर, अंत्री (मलकापूर) येथे श्री राम महाराज मेहुणकर जन्मशताब्दी महोत्सवाचा आज चौथा दिवस अत्यंत उत्साहात पार पडला. भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भाविक तल्लीन झाले होते. चौथ्या दिवशीच्या कीर्तनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अफाट गर्दी केली. भक्तिमय वातावरणात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून, श्रीराम महाराजांच्या नामस्मरणाने वातावरण भारावून गेले आहे. या पावन महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## मारवाड़ी महिला संमेलनचा महिलांना माठ वितरण उपक्रम



**अकोला:** सामाजिक व मानवीय सेवेत सक्रिय अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलनच्या अकोला शाखेच्या वतीने भीषण गर्मीत महिलांना शीतल जल मिळो यासाठी अक्षय तृतीयाच्या दिनावर गरजू महिलाना मातीचे माठ वितरण उपक्रम साकार करण्यात आला.यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.संमेलनच्या स्थानीक अध्यक्ष संध्या अग्रवाल यांच्या पुढाकारात व सचिव दीप्ति सिकरिया,कोषाध्यक्ष हेमा खटोड़ व संमेलन च्या संस्कार संस्कृति समितीच्या प्रमुख कीर्ति काबरा,रेखा अग्रवाल यांच्या उपस्थितीत स्थानीय राणी सती धाम मध्ये उपस्थित सदस्य कडून संकल्प घेत मातीचे माठ,आंबे साखर व चाळणी साहित्य गरजू महिलाना प्रदान करण्यात आले.या उपक्रमचा ५५ गरजू महिलांनी लाभ घेत या उपक्रमाची प्रशंसा केली.यावेळी बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

## इनरव्हील क्वीन ने महिला रुग्णालयातील बालकास केली मदत

**अकोला:** सामाजिक सेवाभावी कार्यात सक्रिय असणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूरच्या वतीने शासकीय जिल्हा महिला रुग्णालयात दुर्मिळ रोग असणाऱ्या गरजू बालकास सहाय्य केले क्लब अध्यक्ष कविता पोहरे यांच्या पुढाकारात क्लबच्या महिला पदाधिकाऱ्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या बाल कक्षास भेट देत रुग्ण बालकाची चौकशी केली.

# फडणवीस सरकारने वाढविली बुवाबाजी !

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला:** राज्यात देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात सरकारने अंधश्रद्धा आणि बुवाबाजी वाढविली तसेच अंधश्रद्धा निर्मूलन कायदासुद्धा राबविण्यात अपयशी ठरले असा खळबळजनक आरोप अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रा. श्याम मानव यांनी येथे केला.

महिलांना मानसिक आधार,आजारांवर उपचार, नवस-पूजा, भविष्य सांगण्याच्या नावाखाली प्रलोभने दिली जातात. त्यातूनच त्या जाळ्यात अडकतात, अशा बाबांकडून महिलांचे केवळ आर्थिकच नव्हे, तर शारीरिक शोषणही मोठ्या प्रमाणात होते. अज्ञान, भीती

### ◆ प्रा.श्याम मानव यांचा खळबळजनक आरोप



आणि श्रद्धेचा गैरफायदा घेत महिलांना गुलाम बनवले जाते, अशात राज्यात बुवा बापू टाकून चा मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे असे ते म्हणाले.स्थानिक रामदासपेठ येथील मराठा मंडळ सभागृहात शनिवारी बुवाबाजी विरोधी परिषद घेण्यात आली. दरम्यान, शनिवारी सायंकाळी झालेल्या जाहीर सभेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आयोजित जाहीर सभेत प्रा. श्याम मानव यांनी बुवाबाजीवर सडेतोड हल्ला चढवला. या सभेत त्यांनी खरातसारख्या भोंदू बाबांच्या कृत्यांवर गंभीर आरोप केले.

'बुवा तिथे बाया' या विषयावर बोलताना त्यांनी महिलांची होत असलेली फसवणूक, शोषण आणि अंधश्रद्धेचे जाळे याचा पर्दाफाश केला. सभेत त्यांनी नागरिकांना सावध करताना सांगितले की, कोणताही 'चमत्कार' हा विज्ञानावर आधारित हातचलाखी असते. 'ढोंगी बाबांना ओळखण्यासाठी प्रश्न विचारणे, पुरावे मागणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे,' असे त्यांनी नमूद केले. तसेच, आजपर्यंत अनेक बुवा-बाबांचा भंडाफोड केल्याचा उल्लेख करत त्यांनी अशा प्रवृत्तीविरोधात लढा सुरूच राहील, असा इशाराही दिला.

# सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये सन्मान सोहळा

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोट:** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये दि. १३ रोजी विद्यार्थी व शिक्षकांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले या कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया लूणकर डागा, प्रमोद चांडक, प्रमुख अतिथी पर्ल ऑईस्टर स्कूलच्या अध्यक्षा रूपाली तिडके(भारसाकडे) , शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा ,प्रा. डॉ कविता मिश्रा,कोमल राठी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे कुमकुम तिलक व सरस्वती पूजनाने झाली मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर प्रविण कुलट यांनी स्वागत गीत सादर केले.देवयानी येवतकार व स्वरा वानखेडे यांनी गीत सादर केले



. वर्ग नववीचा विद्यार्थी स्वरीत पुंडकर यांनी विद्यार्थ्यांसोबत स्कूल प्लेज वाचन केले. व स्कूलचा हेड बॉय संकेत गरजे याने स्वागत पर भाषण दिले वर्ग तिसरी ते पाचविच्या विद्यार्थ्यांनी सिद्धार्थ अंभोरे यांच्या नेतृत्वाखाली मनमोहक नृत्य सादर केले वर्ग नर्सरी ते नववीच्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना गौरव चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता . प्रमुख अतिथी रूपाली तिडके, प्रमोद चांडक यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. संस्थेचे नवनीत लखोटिया यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे गरजेचे आहे असे सांगून . संस्थेच्या प्रगतीवर प्रकाश टाकला व सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निधी कुकडे व प्रेक्षा गेबड तसेच आभार प्रदर्शन धनश्री कुलट यांनी केले.

## ग्रामपंचायतीत महात्मा बसवेश्वर महाराज जयंती साजरी





प्रतिनिधी २० एप्रिल

**अडगाव बु. :** येथील ग्रामपंचायत कार्यालयात बाराव्या शतकातील थोर समाजसुधारक व वचन साहित्याचे प्रणेते महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी 'कायकवे कैलास' या बसवेश्वरांच्या विचारांचा जागर करत समता, बंधुता आणि श्रमप्रतिष्ठेचा संदेश दिला होता. याप्रसंगी महादेवआप्पा मुंगसे, संजयभाऊ राजनकार, अजयआप्पा धाके, अनिलभाऊ मानकर, गजाननआप्पा मुंगसे, महेशआप्पा धाके, पत्रकार नरेन्द्र उर्फ नानाभाऊ देशमुख, दीपकआप्पा कौठकार, निलेशभाऊ देशमुख, शक्तीआप्पा ढगे, पत्रकार गणेशभाऊ बुटे, श्रीकृष्णभाऊ चतुरकार, राजूआप्पा कौठकार, जमीर भाई, दीपक मानकर, शिवकुमारभाऊ मुरकर, गावचे युवा नेतृत्व अभिजितआप्पा ढगे आदी वीरशैव लिंगायत समाज बांधव व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्शीटाकळीत डीपीला आग लागली मात्र यंत्रणा झोपलेली

आझम खान २० एप्रिल

**बार्शीटाकळी:** सध्या तापमान कमालीचे वाढले आहे. शनिवारी रात्री साडे अकरा वाजता कासम नाना चौका समोर हिरो होंडा शोरूम जवळ डीपीला अचानक आग लागली. लोकांनी डीपीकडे धाव घेतली. संबंधित कर्मचारी व अधिकारी यांना फोन लावले पण त्यांचे मोबाईल नॉट रिचेबल होते. यावरून अनास्था दिसते. एखाद्या वेळी मोठी दुर्घटना घडली तर कोण जबाबदारी घेणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### ◆ गावातील काही भाग रात्रभर अंधारात



बार्शीटाकळीच्या ऑपरेटरशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, पझई, लाईनमन इंगळे, जामनिक मॅडम यांची फ्युज कॉलवर ड्युटी आहे. पण एकानेही फोन उचलले नाही. एकीकडे डीपीवर आग लागली होती. तर दुसरीकडे एका बारा वर्षीय लहान मुलाचा मृत्यू झाला होता. त्या घरी लाईट नसल्याने कुटुंबीयांना मोबाईल लाईट वर परिस्थिती हाताळावी लागली. रात्री दोन वाजता बार्शीटाकळीचे सहाय्यक अभियंता शिंदे यांना फोन लावला त्यांनी पण फोन उचलला नाही. गावात रात्रभर गडबड होती.

## प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट मध्ये महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

प्रतिनिधी २० एप्रिल

**आलेगाव:** स्थानिक प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट येथे जगदज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाचे औचित्य साधून संस्थेचे आधारवड श्री सुभाषजी जैन यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनप्रवासातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडले. ठमहाराजांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत,ठ असे त्यांनी यावेळी नमूद केले. **महत्त्वाच्या उपस्थितांचे मार्गदर्शन:**

आलेगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव बसवेश्वर अप्पा वीर यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. महाराजांनी दिलेला समतेचा आणि 'कायकावे कैलास' (कष्ट हाच स्वर्ग) हा संदेश प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम जयंती महोत्सव साजरा



प्रतिनिधी २० एप्रिल

**आलेगाव :** १६ एप्रिल रोजी आलेगाव येथे श्री गुरुदेव सेवा मंडळ शाखा आलेगाव च्या वतीने ग्रामजयंती महोत्सव साजरा करण्यात आला राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या जन्म दिवसानिमित्त सर्व देशात ग्राम जयंती उत्सव म्हणून साजरा करण्यात येते. यावेळी आलेगाव येथे सुद्धा श्री गुरुदेव सेवा मंडळ आलेगावच्या वतीने ग्राम जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी सुरुवात भजन संम्मेलनाने करण्यात आली यानंतर सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.प्रामुख्याने कार्यक्रमाला आलेले राष्ट्रीय कीर्तनकार श्री शुकदास दादा गाडेकर तसेच जिल्हासेवाधिकारी शिवाजी दादा म्हैसने, मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नंतर राष्ट्रीय कीर्तनकार ह भ प शुकदास दादा गाडेकर यांचे जाहीर कीर्तन संपन्न झाले. यावेळी युवा व कौटुंबिक वातावरण यावर गाडेकर दादांनी प्रकाश टाकला. त्यांच्या कीर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते त्यांनी सांगितले ग्रामगितेत नागरिकांच्या जीवनाविषयी तसेच गावाच्या समस्ये विषयी सर्व प्रश्नांची उत्तरे सापडतात. रिकामा कश्याला फिरत तुझं गावाच नाही का तिर्थ या प्रमाणे अनेक दाखले देत युवकांना गावाच्या, स्वतःच्या विकासासाठी प्रतिबद्ध व्हायला हवे असे सांगितले या कार्यक्रमाला गावा सहित बाहेर गाववरून सुद्धा गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते आले होते.

# नगरसेवक निलेश देव यांनी महापालिका अधिकाऱ्यांना कंदील भेट दिला

### ◆ वंचित कडून दिरंगाईचा तीव्र निषेध

प्रतिनिधी २० एप्रिल



**अकोला:** न्यू तापडिया नगर मधील उड्डाणपुलाला ९ वर्ष तसेच पथदिवे लावण्यासाठी ९ वर्षे. हा जो काही प्रकार सुरू आहे त्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे मनपातील गटनेते निलेश देव यांनी आज विद्युत विभाग प्रमुख अमोल डोईफोडे यांना कंदील भेट दिले. देव यांनी म्हटले की हद्दवाढ भागासाठी २०१८ साली पथदिवे लावण्याची मंजुरी मिळाली होती. परंतु अजून देखील काम झाले नाही. हा प्रकार असाच सुरू राहीला तर वंचित बहुजन आघाडी आपल्या पद्धतीने आंदोलन उभारेल असा इशारा दिला.





सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २० एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# 34 तरुणी बेपत्ता प्रकरण : राळेगाव शहरात बंदची हाक

प्रतिनिधी २० एप्रिल

**यवतमाळ :** आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या मतदार संघातील राळेगाव आणि अन्य परिसरातून ३४ तरुणी बेपत्ता झाल्याचा खळबळजनक आरोप भाजपाचे जिल्हाध्यक्ष प्रफुल चौहान यांनी केला आहे. या आरोपामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, स्थानिक हिंदुत्ववादी संघटनांनी सोमवारी राळेगाव शहरात बंदची हाक दिली आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष चौहान यांनी या प्रकरणात मानवी तस्करीच्या रॅकेटचा इशारा दिला आणि लव जिहादसारख्या शंका देखील व्यक्त केल्या आहेत. एक ऑडीओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाची गंभीरता आणखी वाढली आहे. ऑडीओ क्लिपमध्ये आरोपितांच्या कामकाजाच्या पद्धतीचा खुलासा करण्यात आला आहे. चौहान यांनी आरोप केला की, गरीब पालकांना पैसे देण्याचे आमिष दाखवून मुलींना पळवले जात आहे. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांना चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशी





सुरू असून, या प्रकरणात पुणे, मुंबई आणि बंगळूरपर्यंतचा नेटवर्क असल्याचे संकेत दिले जात आहेत. विशेषतः, या प्रकरणात अल्पवयीन मुलींच्या मानवी तस्करीचा संबंध असल्याचा आरोप भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी केला आहे. आज सकाळपासून राळेगाव शहरातील प्रतिष्ठाने बंद ठेवली गेली होती. शहरातील व्यापारी आणि व्यावसायिकांनी आंदोलनाला समर्थन दिले. रस्त्यावर टायर पेटवून आंदोलनकर्त्यांनी या प्रकरणाचा निषेध केला आणि संबंधित टोळीचा पर्दाफाश करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. पोलीस प्रशासनाने शहरात चोख बंदोबस्त तैनात केला असून, कुठल्याही अनुचित प्रकारापासून टाळण्यासाठी सुरक्षा वाढवली आहे. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आज राळेगाव शहरात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि तपासाची स्थिती समजून घेतली.

# तांब्याची केबल चोरी ; तिघांना अटक

## यवतमाळ शहर डि बी पथकाची कारवाई

प्रतिनिधी २० एप्रिल



**यवतमाळ :** शहरातील कॉटन मार्केट परिसरात गोडाऊन फोडून तब्बल ४.५७ लाख रुपयांच्या तांब्याच्या केबलची चोरी करणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे प्रगटीकरण पथकाने अवघ्या काही तासांत अटक केली. आरोपींकडून सुमारे १.१५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आकाश उर्फ भोई सुरेश शेंडे (वय १९), अक्षय भास्कर सहारे (वय ३१) आणि राहुल सुरेश गुरदे (वय २४, सर्व रा. यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सतीश अशोक बडनलवार (वय २९, रा. ऐश्वर्य होम, धामणगाव रोड) यांनी १९ एप्रिल रोजी तक्रार दाखल केली. ते आपल्या गोडाऊनमध्ये माल तपासत असताना वायर बंडलमधील तांब्याच्या केबलची चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तपासणीअंती प्रोनिक प्लस कंपनीचे केबल तसेच ओरिएंट डीसी केबल असा एकूण ४ लाख ५७ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने व प्रभारी पोलिस निरीक्षक नंदकिशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला. दरम्यान, गोपनीय माहितीच्या आधारे आठवडी बाजार परिसरात सापळा रचण्यात आला. या कारवाईत आकाश उर्फ भोई सुरेश शेंडे (वय १९), अक्षय भास्कर सहारे (वय ३१) आणि राहुल सुरेश गुरदे (वय २४, सर्व रा. यवतमाळ) यांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून ओरिएंट डीसी केबलचे तीन बंडल असा सुमारे १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई गुन्हे प्रगटीकरण पथकाचे प्रमुख पोलिस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दिपक घोगरे, पोलिस हवालदार रावसाहेब शेंडे, किरण पडपण तसेच पोलिस शिपाई गौरव ठाकरे, पवन नांदेकर, पवन तडसे, प्रदीप कुरडकर, मयूर तेल्लेवार आणि प्रतिक नेवरे यांनी केली. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# वृद्ध महिलेचा गिट्टी खदानीत बुडून मृत्यू

प्रतिनिधी २० एप्रिल

**मारेगाव :** तालुक्यातील नरसाळा येथील सरकारी गिट्टी खदानीत पाण्यात बुडून ६४ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून खदान परिसरातील सुरक्षेअभावी नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

ृत महिला सौ. बेबीबाई तुळशिराम राजगडकर (वय ६४, रा. नरसाळा) या १९ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ८.४५ वाजताच्या दरम्यान कपडे धुण्यासाठी गावातील गिट्टी खदान परिसरातील पाण्याच्या खड्यात गेल्या होत्या. बराच वेळ उलटूनही त्या घरी परतल्या नसल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. दरम्यान, गावकऱ्यांच्या माहितीनुसार पाय घसरून त्या पाण्यात पडल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. शोधमोहीमेदरम्यान त्या पाण्यात बुडालेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्यांना तत्काळ बाहेर काढून ग्रामीण रुग्णालय, मारेगाव येथे नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच



मारेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. याप्रकरणी कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. मृत महिलेच्या पश्चात पती, दोन मुलं, सुना व नातवंड असा परिवार आहे. दरम्यान, खदान परिसरात कोणत्याही प्रकारच्या सुरक्षेच्या उपाययोजना नसल्याने अशा दुर्घटना वारंवार घडत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाने तातडीने सुरक्षाव्यवस्था उभारावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पुसद शहरात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न : डॉ. मोहम्मद नदीम

प्रतिनिधी २० एप्रिल

**पुसद :** शहरात सोशल मीडियाच्या माध्यमातून दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. मोहम्मद नदीम यांनी केला आहे. "जिम टोळी" या मथळ्याखाली फेसबुकवर खोटी व बदनामीकारक पोस्ट टाकून त्यात आपले नाव जोडल्याचा दावा त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

डॉ. नदीम यांनी सांगितले की, ते गेल्या 40 वर्षांपासून सामाजिक



व राजकीय क्षेत्रात सक्रिय असून सर्व समाजांमध्ये त्यांची ओळख आहे. मात्र, संतोष दशरथ राठोड याने खोटी माहिती प्रसारित करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणी वसंतनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलिसांनी संबंधितास नोटीस बजावून चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले. सुरुवातीला अनुपस्थित राहिल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, पोस्ट खोटी असल्याचे निष्पन्न झाले.

संतोष राठोड याने चुकीच्या माहितीच्या आधारे पोस्ट केल्याची कबुली देत माफी मागितल्याचेही समोर आले आहे. पोलिसांनी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई केली आहे. तथापि, या पोस्टमुळे शहरात सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच काही नागरिकांनी पडताळणी न करता ती पोस्ट पुढे पाठवल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाल्याचे दिसून आले.

या पार्श्वभूमीवर केवळ प्रतिबंधक कारवाई पुरेशी नसून संबंधित व्यक्तीसह पोस्ट फॉरवर्ड करणारे आणि आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणाऱ्यांवरही कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. मोहम्मद नदीम यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेला शहराध्यक्ष शेख जिया, तहेसिन पहेलवान, फिरोन खान, प्रकाश नेमायते, नगरसेवक जब्बार लाखे व इरशाद कुरेशी उपस्थित होते.

# महिला आरक्षणावरून भाजप–शिवसेनेचे आंदोलन

प्रतिनिधी २० एप्रिल

**उमरखेड :** लोकसभेमध्ये महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेस पक्षाने विरोध केल्याच्या निषेधार्थ दिग्रस शहरात भाजप व शिवसेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध नोंदवला. महिलांना राजकीय क्षेत्रात योग्य प्रतिनिधित्व मिळणे ही काळाची गरज असून,



अशा महत्त्वाच्या विधेयकाला विरोध करणे म्हणजे महिलांच्या हक्कांवर गदा आणणारे असल्याची प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. भाजप व शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक या आंदोलनात सहभागी झाले होते. दरम्यान, पोलिस प्रशासनाने घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीवर नियंत्रण ठेवले आणि आंदोलन शांततेत पार पडले. महिलांच्या सन्मान व हक्कांसाठी भविष्यातही संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी यावेळी दिला. आंदोलनात दोन्ही पक्षांच्या महिला कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

# दिव्यांगाचे आमरण उपोषण सुरूच

प्रतिनिधी २० एप्रिल

**उमरखेड :** अर्ध्या जागेच्या स्वतंत्र 7/12 नोंदणीसह 7/11 व फेरफार करून मिळावा या मागणीसाठी दिव्यांग स्वप्निल मधुकर पाटील यांनी उपविभागीय कार्यालयासमोर 15 एप्रिलपासून सुरू केलेले बेमुदत आमरण उपोषण पाच दिवस उलटूनही सुरूच आहे. मात्र अद्यापही प्रशासनाकडून ठोस तोडगा न निघाल्याने उपोषणकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

स्वप्निल पाटील आणि त्यांची बहीण वृषाली पाटील हे उमरखेड नगरपरिषद हद्दीतील सर्वे क्रमांक 10/1 मधील प्लॉट क्रमांक 15 च्या खुल्या जागेचे तसेच घराचे सामायिक



मालक असल्याचे सांगितले जात आहे. सुमारे 258.87 चौ.मी. क्षेत्रफळातील या मालमत्तेबाबत पूर्वी सर्व संमतीने खरेदीखत नोंदवून नमुना 8 असेसमेंट व नकाशा तयार करण्यात आला होता. मात्र, आता अर्ध्या मालकीच्या हिश्श्याबाबत स्वतंत्र 7/12 व 7/11 फेरफार करून मिळावा, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर न्याय मिळावा यासाठी दिव्यांग स्वप्निल पाटील यांनी उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. "नगरपरिषद आणि महसूल प्रशासनानेच न्याय द्यावा," अशी त्यांची आर्त मागणी आहे. उपोषणस्थळी शिवसेना सहसंपर्क प्रमुख शिंदे गटाचे चितांगराव कदम, सुरेश कदम आणि कैलास कदम यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी उपोषणकर्त्यांना लवकरच न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन दिले आहे. मात्र, पाच दिवस उलटूनही तोडगा न निघाल्याने प्रकरण गंभीर बनले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर

प्रतिनिधी २० एप्रिल

**कळंब :** तालुक्यातील जोडमोहा महसूल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराचे आयोजन आज दिनांक 17 एप्रिल 2026 रोजी संत सेवालाल महाराज मंदिर येथे करण्यात आले. जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी राळेगाव आणि तहसीलदार कळम यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले.

शिबिराची सुरुवात गावात प्रभात फेरी काढून करण्यात आली. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी जोडमोहा येथील सरपंच सुनंदा मुरकुटे होत्या. शिबिरास नायब तहसीलदार अभय देशपांडे, अनंत बकाले, अनिल राजगुरे, माला गेडाम, संध्या मनोहर



(निरीक्षण अधिकारी), केंद्रप्रमुख हेडाऊ, गटविकास अधिकारी बाहेकर, भूमी अभिलेख अधिकारी नान्नने तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. माणिक घोरसडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरात महसूल, कृषी, आरोग्य, भूमी अभिलेख, परिवहन, सहकार, पुरवठा, दुय्यम निबंधक, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, उमेद, महावितरण आणि वन विभाग आदी विविध विभागांच्या योजना राबविण्यात आल्या. एकूण ३०६८ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत विविध शासकीय योजनांचे लाभ प्राप्त केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडल अधिकारी प्रशांत घडिकर, ग्राम महसूल अधिकारी दिपाली हर्षे, मिलिंद गुबरे, स्नेहल फुलमाळी, दुर्गा शेळके, कैलास बानाईत तसेच महसूल सेवक मनोज पवार, लक्ष देवनाळे, ममता कांबळे आणि श्रीकृष्ण परचाके यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'युवा संवाद' उपक्रमाचे 21 एप्रिलला उद्घाटन

प्रतिनिधी २० एप्रिल

**यवतमाळ :** जिल्ह्यातील तरुणांसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या 'युवा संवाद' या नाविण्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन येत्या 21 एप्रिल रोजी होणार आहे. या उपक्रमा च्या अनुषंगाने निर्माण केलेल्या माहिती पत्रकाचे प्रकाशन पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते गुरुवारी महसूल भवनात करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश तरुणांना स्पर्धा परीक्षा तसेच करिअरविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा आहे. या कार्यक्रमात आयएएस व आयपीएस अधिकारी सहभागी होऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. हा युवा संवाद कार्यक्रम बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी 11 ते 2 यावेळेत आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील इच्छुक तरुणांनी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी पोस्टरवरील क्यूआर कोड स्कॅन करून नोंदणी करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. या माहिती पत्रक प्रकाशनवेळी जिल्हाधिकारी विकास मीना, उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड, पूनम अहिरे, सीएम फेलो विठ्ठल गाडगे, प्रसाद कुलकर्णी, कुणाल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# अंधश्रद्धा, बुवाबाजी व कर्मकांडापासून दूर राहा : विठ्ठल कांगने

प्रतिनिधी २० एप्रिल

**पुसद :** विद्यार्थ्यांनो अंधश्रद्धा, बुवाबाजी व कर्मकांडापासून दूर राहा. बाबासाहेबांच्या 22 प्रतिज्ञांचे पालन करून संविधानानुसार जीवन जगावे, तसेच प्रत्येक घरातून एक मुलगा व एक मुलगी उच्च शिक्षण घेऊन प्रशासनात यावी, असा संदेश विठ्ठल कांगने यांनी दिला. पालकांनी मुलांवर विशेष लक्ष द्यावे, मोबाइल व सोशल मीडियाचा अतिरेक टाळावा, असा सल्लाही त्यांनी दिला.




प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, पुसद यांच्या वतीने प्रबोधन पर्व 2026 अंतर्गत आयोजित चार दिवसीय गायन व प्रबोधन कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक तथा बहुजन विचारांचे अभ्यासक विठ्ठल कांगणे यांच्या व्याख्यानाला हजारोंच्या संख्येने विद्यार्थी, युवक व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महिला मंडळाच्या उपस्थितीत बुद्धवंदनेने करण्यात आली. त्यानंतर अध्यक्ष दिगंबर जगताप (मराठा सेवा संघ, राज्य उपाध्यक्ष) यांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतात दिगंबर जगताप यांनी शिव, फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा घराघरात पोहोचली पाहिजे असे सांगत समाजबांधवांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून समीर वानखेडे (IRS, अतिरिक्त आयुक्त भारत सरकार) आणि जयदीप कवाडे (उपाध्यक्ष, लघुउद्योग महामंडळ, महाराष्ट्र शासन) यांनीही विद्यार्थ्यांना यूपीएससी व एमपीएससी परीक्षांबाबत मार्गदर्शन केले. विदर्भातून दरवर्षी किमान 10 IAS व IPS अधिकारी घडावेत, अशी अपेक्षा समीर वानखेडे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास प्रभाकर टेटर (माजी अध्यक्ष, मराठा सेवा संघ), बाळासाहेब वाठोरे (रिपाइं आठवले अध्यक्ष), राजू साळुंखे (पाणीपुरवठा सभापती), रंगराव काळे (माजी शिक्षणाधिकारी), नितीन पवार (माजी सभापती), डॉ. सुनील खाडे (प्रज्ञापर्व समिती अध्यक्ष 2026), अभिजीत पानपट्टे (बांधकाम सभापती), डॉ. राहुल भगत, सुधाकर कांबळे (जवळा), नारायणराव गायकवाड, गणपत गव्हाळे (राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद अध्यक्ष), संदीप कावळे (कृषी सहाय्यक) आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती पुसद प्रबोधन पर्व 2026 चे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# उमरखेड येथे महात्मा बसवेश्वर जयंती

प्रतिनिधी २० एप्रिल

**उमरखेड :** बाराव्या शतकातील आद्य क्रांतिकारक, वीरशैव लिंगायत धर्मसंरक्षक व समतावादी चळवळीचे जनक जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची ९२१ वी जयंती शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातून पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेची शोभायात्रा महात्मा बसवेश्वर संस्थान येथून प्रारंभ होऊन बसवलिंग स्वामी मठ, नाग चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी चौक, खडकपुरा, शहीद चौक, सराफा लाईन, आठवडी बाजार मार्गे काढण्यात आली. शेवटी शोभायात्रेचे विसर्जन महात्मा बसवेश्वर संस्थान शिव मंदिरात करण्यात आले. मार्गावर ठिकठिकाणी



नागरिकांनी प्रतिमेस अभिवादन केले तसेच पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शोभायात्रेत वीरशैव लिंगायत महिला भजनी मंडळ, बँड पथक, जयघोष करणारा युवा वर्ग तसेच पारंपरिक पाऊली खेळणाऱ्या महिलांच्या सहभागामुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले होते. समाजाच्या उद्धारासाठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात 'अनुभव मंडप' स्थापन करून सर्व जातीधर्मीयांना विचार मांडण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. 'श्रम हाच ईश्वर' हा मूलमंत्र देत त्यांनी श्रमप्रतिष्ठेचा संदेश दिला. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये त्यांच्या विचारांतून अधोरेखित झाल्याचे मानले जाते.

या कार्यक्रमास आ. किसन वानखेडे, नगराध्यक्ष तेजश्री जैन, महात्मा बसवेश्वर संस्थानचे अध्यक्ष संतोष माधवअप्पा हिंगमिरे, नगरसेवक गजानन रासकर, नगरसेविका लाहेवार, वीरशैव लिंगायत समाज संघटनेचे अध्यक्ष रत्नाकर पुजारी, पंचाक्षरी खडकेश्वर महाराज, आर्य वैश्य समाज आदींसह विविध संस्था व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा बसवेश्वर संस्थान, वीरशैव लिंगायत समाज संघटना, महिला मंडळे व युवा वर्ग यांनी विशेष सहकार्य केले.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## आधारभूत खरेदी योजनेतंर्गत ज्वारी, मका खरेदीची नोंदणी प्रक्रिया सुरु

**शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करण्याचे आवाहन**

**अमरावती :** जिल्ह्यामध्ये रब्बी हंगाम २०२५-२६ अंतर्गत ज्वारी, मका खरेदी करण्यासाठी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत दहा खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. अचलपूर, मोर्शी, वरूड, नांदगाव खंडेश्वर, चांदुर बाजार, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चांदूर रेल्वे, तिवसा, धामणगाव या केंद्राच्या तालुका खरेदी विक्री संघाचा समावेश राहील. हमी भावाने खरेदीसाठी नोंदणी कालावधी ३० एप्रिल २०२६ पर्यंत राहील. तसेच तुर, चना पिकाच्या खरेदीसाठी आवश्यक बारदाना लवकरच उपलब्ध केल्या जाईल व खरेदी केंद्र पूर्ववत कार्यान्वित होतील, अशी माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित मुंबईचे संचालक नितीन हिवसे यांनी दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केले आहे.

## जांबू येथे वीज पडून तीन महिला गंभीर

प्रतिनिधी २० एप्रिल

**धारणी:** तालुक्यात रविवारी दुपारच्या सुमारास अवकाळी वातावरणात विजाचा प्रचंड कडकडाट सुरु असताना जाबू येथे वीज कोसळून धक्कादायक घटना घडली.

या घटनेत एका बकरीचा जागीच मृत्यू झाला असून घटनास्थळी उपस्थित असलेल्या तीन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. अचानक झालेल्या या प्रकारामुळे गावासह परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी सुमारे साडेतीन वाजताच्या सुमारास हरिसाल जांबू गाव परिसरात अचानक ढगाळ वातावरण निर्माण झाले. काही वेळातच विजांचा कडकडाट सुरू झाला आणि पावसाच्या सरी कोसळण्याची चिन्हे दिसू लागली. याच दरम्यान शेताजवळील

परिसरात उभ्या असलेल्या महिलांवर अचानक वीज कोसळली. या घटनेची तीव्रता इतकी होती की, वीज पडताच त्या तिघी महिला तत्काळ बेशुद्ध पडल्या. या घटनेत जखमी झालेल्या महिलांची नावे पार्वती मोतीराम जावरकर (३८), बाली मोतीराम जावरकर (१८) आणि सुनीता

श्यामलाल आवरकर (२६) अशी आहेत. त्या तिघीही एकाच कुटुंबातील असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. वीज कोसळल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या शरीरावर भाजल्याचेही चिन्हे आढळून आले आहेत. एका याच ठिकाणी असलेल्या बकरीवरही वीज कोसळल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या घटनांमुळे

### ◆ एक बकरी ठार

पशुधनाचे नुकसान होणे ही देखील चिंतेची बाब ठरत आहे.घटना घडल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत मदतकार्य सुरू केले. महिलांना बेशुद्ध अवस्थेतून सावरत तातडीने अम्ब्युलन्सला पाचारण करण्यात आले. काही नागरिकांनी स्वताच्या वाहनांमधूनही मदतीसाठी पुढाकार घेतला. तत्परतेने प्रतिसाद देत जखमी महिलांना उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या त्यांच्यावर डॉक्टरांकडून उपचार सुरु असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.दरम्यान, दुपारपासूनच जांबू गावासह संपूर्ण परिसरात वातावरण ढगाळ झाले होते.

## पिंपरी जहागीरमध्ये भीषण आग

प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती :** ग्रामपंचायत पिंपरी जहागीर, येथे रविवारी दुपारी भीषण आग लागल्याची घटना घडली. शेतमाल, झाडे, लाकूड (कूटर) तसेच शेतीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आगीत जळून खाक झाले.

अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांनी दुपारी ०२.२७ वाजता फोनद्वारे घटनेची माहिती दिल्यानंतर, पाळी प्रमुख व केंद्रप्रमुख यांच्या आदेशानुसार फायर लॉरी तत्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आली. वाहन चालक सागर टपके आणि फायरमन अमोल साळुंके, निशांत राठोड यांनी घटनास्थळी पोहोचताच होजरी व



डिलिव्हरी होजच्या साह्याने आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की धुराचे व आगीचे लोट दूरपर्यंत दिसत होते, त्यामुळे गावात काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र अग्निशमन दलाच्या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेदरम्यान दोन अग्निशमन वाहनांनी पाण्याचा मारा करून परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिसांचे पथकही घटनास्थळी दाखल झाले. या आगीत कुटार, लाकूड, शेणखत व शेतीसाठी लागणारे साहित्य जळून खाक झाले असून अंदाजे २ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य सुरेंद्र सावरकर यांनी दिली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही किंवा कोणीही जखमी झाले नाही. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली असून संपूर्ण गावाला आग व धुरापासून वाचवण्यात यश आले.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतली आढावा बैठक

प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती :** महानगरपालिका येथे १८ एप्रिल रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा बैठक घेतली होती. यामध्ये संपूर्ण विभागाचा आढावा घेण्यात आला. यावेळी शिक्षण सभापती अँड. प्रीती रेवणे यांनी मनपा व्यवस्थापनाच्या शाळाचे गुनात्मक विकासाबाबत माहिती दिली आणि खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेच्या तुलनेत कुठेच मागे नाही असे नमूद केले. परंतु भौतिक सुविधाचा काही प्रमाणात अभाव असल्यामुळे पालक वर्ग मुलांचा प्रवेश या शाळेमध्ये करीत नाहीत. यामध्ये जीर्ण अवस्थेत शाळेच्या इमारती झाल्या आहेत. काही शाळा ह्या १



इमारत मध्ये भरल्या जातात त्यामुळे त्या इमारतीचे बांधकाम होणे गरजेचे आहे त्याकरिता आपल्या कडून निधी मिळावा अशी मागणी शिक्षण सभापती यांनी केली. या मागणीला पालकमंत्री मंत्री यांनी तात्काळ होकार देऊन दरवर्षी १५ कोटी रुपये ची तरतूद करण्याचे आश्वासन दिले. यामुळे मनपा च्या शाळांचा कायापालट लवकर होणार आहे. या सर्व तरतुदी करिता शिक्षण सभापती अँड प्रीती रेवणे यांच्या पुढाकारणे हे पुर्ण झाले आहे

मनपा शाळांच्या दुरुस्तीसाठी नूतनीकरणासाठी व नवीन शाळा निर्मितीसाठी ४४ कोटी निधीची तरतूद करण्यात आली तीन टप्प्यांमध्ये तो निधी दिल्या जाईल असे माननीय पालकमंत्री यांनी जाहीर केले. महानगरपालिकेच्या शाळांच्या कंपाउंड वॉल वाढवणे, रंगरंगोटी करणे आणि पूर्व माध्यमिक शाळांच्या मुलांसाठी खेळणी डिजिटल रूम प्रत्येक शाळेमध्ये कम्प्युटरची व्यवस्था आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्या संदर्भात व त्याचे मॉनिटरिंग होण्यासंदर्भात प्रस्ताव मांडण्यात आले व त्याला पालकमंत्र्यांकडून मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्यात आले

जिल्हा वार्षिक नियोजन याच्यामध्ये महानगरपालिकेत शिक्षणासाठी स्वतंत्र हेड नव्हता आजच्या सभेमध्ये अँडव्होकेट प्रीती रेवणे शिक्षण सभापती यांनी हा विषय पालकमंत्री महोदय यांच्यासमोर मांडला आणि त्यांनी तो तात्काळ मंजूर केले सभापती महोदयांच्या पाठपुराव्याला आलेले हे मोठे यश आहे. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, मधुरा कहाळे, नंदा सावदे, राधा कुरील आदि उपस्थित होते.

## बेघर बांधवांच्या साक्षीने फुले-आंबेडकर विचारांचा जागर

प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती :** आधार बेघर निवारा, बडनेरा येथे आधार संघाच्या वतीने समाजप्रबोधनाचे महान प्रेरणास्थान महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रदर्शनी व अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विशेष म्हणजे या कार्यक्रमास बेघर बांधवांचीही उपस्थिती लाभली, ज्यामुळे कार्यक्रमाला सामाजिक संवेदनशीलतेची वेगळीच छटा प्राप्त झाली.

नवी वस्ती परिसरातील महिला बचत गट तसेच विविध वस्तीस्तर संघांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

### ◆ बडनेऱ्यात महिलाशक्तीचा उपक्रम





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. ज्योतीताई राठोड (संचालक, आधार बेघर निवारा केंद्र) होत्या. प्रमुख अतिथी म्हणून छाया नारनवरे, कल्पना हरणे, विजया घोडेस्वार, नूतन वासनिक, छाया भटक . अनुपमा गोंडाने, मा. रेखा मुळे, सीमा मडामे तसेच शिला चौधरी (नवनिर्माण संघ – नियोजित) यांची उपस्थिती लाभली. विविध संघांच्या अध्यक्षा देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मार्गदर्शनपर भाषणात . विजय डवरे (जिल्हा प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती), . पल्लवी ढोले (महा. अनिस, बडनेरा) तसेच . प्रफुल्ल मंदा श्रीधर (समुदाय संघटक) यांनी समता, शिक्षण, स्वाभिमान व वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात संगीता बरमैया यांनी बाबासाहेबांवरील सुंदर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच पदमा पहूरकर, . पहूरकर (ज्येष्ठ नागरिक) व रोहित धोंगडे (काळजीवाहक, आधार) यांचीही उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक . सोनल जगदाळे (सचिव, आधार संघ) यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन .मनाली अभिजीत इंगळे यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन उमा इंगोले यांनी केले. या निमित्ताने महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित महिलांनी उत्साहाने सहभाग घेत समता, स्त्रीसक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## कारागृह की 'ड्रग्ज हब'? पुन्हा फेकला 'गांजा बॉल'

### ◆ जेल प्रशासनाचे 'वॉच टॉवर' झोपेतच : फ्रेजरपुऱ्यात गुन्हा

प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती :** जिल्हा मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षा व्यवस्था पुन्हा एकदा कागदावरच असल्याचे सिद्ध झाले आहे. कारागृहाच्या कडेला असलेल्या हायवेवरून अज्ञात इसमाने कारागृहाच्या आत गांजाचा गोळा फेकल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. १६ एप्रिल रोजी दुपारी १२:३० ते १:३० च्या सुमारास बॅरेक नं. १४ आणि १५ च्या दरम्यान असलेल्या शौचालयाच्या छतावर तो गांजाचा गोळा आढळला.

**प्रशासनाची हलगर्जी**

तुरुंगाच्या आत अमली पदार्थ पोहोचविण्यात प्रशासनातील काही घटकांचे संगनमत तर नाही ना, अशी शंका आता उपस्थित होत आहे. हायवेवर उभे राहून उद्या शस्त्रेही आत पोहोचू शकतात. दोन वर्षांपूर्वी कारागृहात जळता फटाका फेकण्यात आला होता, हे विशेष.

यांप्रकरणी कारागृह शिपाई किरण नागरे यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी १८ एप्रिल रोजी पहाटे अज्ञाताविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा नोंदविला.

१६ एप्रिल रोजी दुपारी १२:३० ते १:३०च्या सुमारास वरिष्ठ तुरुंगाधिकारी देवराव जाधव हे संचार फेरीवर असताना, शौचालयाच्या छतावर काहीतरी पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कर्मचाऱ्यांच्या मदतीने तपासणी केली असता, काळ्या चिकटपट्टीने गुंडाळलेला एक गोल गोळा आढळला. जेव्हा हा गोळा उघडून पाहिला, तेव्हा त्यात ६४.७० ग्रॅम ओला गांजा आणि गुंडाळलेला दगड आढळला. जप्त केलेल्या गांजाची किंमत सुमारे ३,२०० रुपये आहे.

## गाडगेबाबा महाराज वृद्धाश्रमाला श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाची भेट

प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती :** सामाजिक बांधिलकी व बी एड अभ्यासक्रम मधे सामाजिक कार्य या अंतर्गत श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांच्या वतीने वलगाव येथील श्री गाडगेबाबा महाराज वृद्धाश्रमास भेट देण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कैलास बोरसे सर होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविकाने झाली. प्रास्ताविक डॉ. किशोर क्षत्रिय यांनी केले, तर उद्बोधन डॉ. वनिता काळे प्रा. डॉ अंजली ठाकरे यांनी केले.

या भेटीदरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आश्रमातील निवासी आजी-आजोबांशी आत्मीयतेने संवाद साधत त्यांच्या भावना जाणून



घेतल्या. विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ नागरिकांचे मनोबल वाढावे यासाठी प्रेरणादायी विचार मांडले. तसेच त्यांच्यासाठी अल्पोपहाराची व्यवस्था करून आपुलकी व्यक्त केली.

कार्यक्रमात विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी रंगत आणली. भजन गायन मोहिनी बोकाडे, नलिनी नवरे व नम्रता घोम यांनी सादर केले. नृत्य सादरीकरण शिवानी पं, उज्वला पेड्डीवार, निकिता रेखे, सुरेखा परते, नंदिनी गबने, दुर्गा भंडारकर, प्रतिभा नवलकर व प्राजक्ता ढोणे यांनी केले. अभंग सादरीकरण अजय पवार व रोशन गायगोले यांनी केले. गीत गायन सचिन काळपांडे यांनी सादर केले.

यानंतर विद्यार्थ्यांनी आश्रम परिसराची स्वच्छता करून सामाजिक सेवेत सक्रिय सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या या कार्यामुळे स्वच्छतेचा संदेशही देण्यात आला.

प्राचार्य डॉ श्री विनय राऊत यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, प्रेरणादायी व सामाजिक जाणिवा वृद्धिंगत करणारा ठरला. विद्यार्थ्यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन दुर्गा भंडारकर यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सूरज फुले यांनी प्रभावीपणे केले. या प्रसंगी सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनपा उच्च प्राथमिक शाळा महादेवखोरीच्या विद्यार्थ्यांची नृत्य नाटिकेतून क्रांतीबा व ज्ञान सूर्यास मानवंदना



प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती :** महात्मा ज्योतिबा फुले तथा विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती पर्वावर मनपा उच्च प्राथमिक शाळा महादेवखोरीच्या विद्यार्थ्यांनी भिमटेकडी येथे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ठसावित्री ज्योतीचा संघर्षठ तथा नृत्याची सादरीकरण करून महामानवांना मानवंदना दिली तसेच महानगरपालिकेच्या शाळेत असणाऱ्या सुविधा व प्रभावी मोफत शिक्षण यामुळे जनतेने शाळेत प्रवेश घ्यावा याकरिता शाळेच्या वतीने उपस्थित प्रचंड जनसमुदायास आवाहन करण्यात आले याप्रसंगी बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवी राणा तथा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डी कर तथा बौद्ध धम्म प्रचार समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते नृत्य तथा नाटिकेला ज्योती बनसोड (शाळा निरीक्षक तथा मुख्याध्यापक मनपा शिक्षण विभाग अमरावती व प्रज्ञा ढंगारे मॅडम) यांनी मार्गदर्शन केले होते या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा ढोणे ताई चवरे ताई ठाकरे ताई सोळंकेताई कुर्वेताई ब दुकले मॅडम सराड सर घोरमाडे ताई व सर्व पालकांचे सहकार्य लाभले.

## उन्हाळ्यात दिलासा! जिल्हा परिषद शिक्षण विभाग अमरावतीत पाणपोईचे उद्घाटन

प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती:** शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक), जिल्हा परिषद अमरावती येथे जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटना व जिल्हा परिषद कर्मचारी युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिक व येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी थंड पाण्याची व्यवस्था म्हणून पाणपोई सुरू करण्यात आली.

सदर पाणपोईचे उद्घाटन मा. सतीश मुगल, शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अमरावती यांच्या हस्ते संपन्न झाले. या उपक्रमामुळे उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमध्ये नागरिक व कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळणार असून, या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या कार्यक्रमास संघटनेचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये

श्रीकांत मेश्राम, विजय भाऊ कोठाळे, पंकज भाऊ गुल्हाने, श्री



गंगाधर मोहने, श्री नरेंद्र गायकवाड, शरद भाऊ शाहकार, विजय भाऊ मालोकार, संजय भाऊ मुंडे, प्रवीण जिसकर, चंदू भाऊ टेकाळे, श्रीमती अर्चना मानकर, विजय राऊत, संजय खडसे, प्रयाग भोंडे, श्रीमती ज्योती गावंडे, प्रांजली मेश्राम, पल्लवी धारणे, साधनाताई पंचभाई, श्रीमती निगोट, अनिकेत, रोशनी ताई पाचघरे, शितल विटी वाले, पंकज सोळंके, संजय जी राठी तसेच श्री रोशन नागपूरकर, श्रीमती वृंदा समर्थ, श्रीमती आशा ढोके, श्री युसुफ शहा, श्री पवन यादव, श्रीमती ज्योती देशमुख व श्री संजय गायकवाड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटना व कर्मचारी युनियन यांच्या वतीने करण्यात आले असून, सर्व उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

## बाल सुधारगृह अमरावती येथुन पळून गेलेले दोन विधीसघर्षित बालक यांना गुन्हे शाखा अमरावती शहर यांनी घेतले ताब्यात

प्रतिनिधी २० एप्रिल

**अमरावती:** बाल सुधारगृह अमरावती येथुन पळून गेलेले दोन विधीसघर्षित बालक यांना गुन्हे शाखा अमरावती शहर यांनी ताब्यात घेतले आहे.

पोस्टे फ्रेजरपुरा अप क्रमांक २४३/२०२६ कलम १३७(२) बिएन एस मधिन विधीसंघर्षित बालक वय १७ वर्ष तसेच पोस्टे फेजरपुरा अप क २५८/२०२६ कलम १३७(२)बि.एन.एस मधिल विधीसंघशित बालक वय १७ वर्ष हे पोस्टे फेजरपुरा येथील घरफोडी व शरिराविरूध्द चे गभिर गुन्हयात बालन्यायालय यांचे आदेशाने बालसुधारगृह रुक्मीणीनगर अमरावती येथे दाखल असतांना एक विधीसंघर्षित बालक हा दिनांक १२/०४/२०२६ रोजी व दुसरा विधीसंघर्षित बालक हा दिनांक १३/०४/२०२६ रोजी पळून गेले होते त्या संर्दभात बालसुधारगृह रुक्मीणीनगर अमरावती यांनी पोस्टे फेनरपुरा येथे दिलेल्या लेखी फिर्यादि वरूण गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्या अनुशंगाने सदर गुन्हयाचे गार्भिय लक्षात घेता गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी सदर बालकांचे शोध घेणे कामी गुन्हे शाखेच्या टिम ला र्निदेशित केले होते.

वरून गुन्हे शाखेच्या टिमने आज दिनांक १८/०४/२०२६ रोजी माहीतीच्या आधारे बाल सुधारगृहा मधुन पळालेल्या दोन्ही विधी संघर्षित बालक यांना चिचफैल अमरावती येथुन शोध घेवुन ताब्यात घेतले.

दोन्ही विधीसघर्षित बालक याचेवर पोस्टे राजापेठ, फेजरपुरा, खोलापुरीगेट सिटी कोतवाली, नांदगाव पेठ येथे तसेच मालमत्ते विरुध्दचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदर ची कारवाई. पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, सपोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार पोहेकॉ दिपक सुंदरकर, सुनिल लासुरकर, जहीर शेख, सचीन बहाळे,, नापोका अतुल संभे, पोकॉ सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले, योगेश पवार यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि २० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## जगण्याची कळ, महागाईची झळ...

जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत. सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते. शेंगदाणे तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ,हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे.



# आंदोलनातून मिळेना न्याय, दिव्यांगावर १८ वर्षापासून अन्याय...

# शासकीय धोरण, त्रास विनाकारण, शेतकऱ्यांचे मरण !


खोटी खरेदी व गट नंबरची 'फिरवाफिरवी'!
सिटी न्यूज सुपरफास्ट
दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांचा मंत्रालयात आत्महत्येचा प्रयत्न
सहनशिलतेचा संपला अंत, अधिकाऱ्यांना नाही खंत!



## * सहनशिलतेचा संपला अंत, अधिकाऱ्यांना नाही खंत

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथील दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखडे यांची शेतजमीन अधिकाऱ्यांनी कागदोपत्री चोरली आहे. ती परत मिळविण्यासाठी गेल्या १८ वर्षापासून लोकशाही व्यवस्थेनुसार प्रशासनाशी लढत आहेत. निवेदन, आंदोलन, उपोषण करून न्याय मिळत नसल्याने दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांना याची खंत नाही. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शासकीय धोरणामुळे दिव्यांग शेतकऱ्याला विनाकारण त्रास होवून मरण यातना भोगाव्या लागत आहे.त्यामुळे आता न्याय मिळत नसल्याने पुन्हा आत्मदहन करण्याचा इशारा दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांनी दिला आहे.

यासंदर्भात त्यांनी याआधी वेळोवेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथे ५४/२ हा गट क्रमांक अस्तित्वातच नाही. मात्र शासकीय रेकॉर्डमध्ये अस्तित्वातच नसलेल्या गट क्रमांकाची तहसिल प्रशासन आणि पटवारी ससाने, ज्ञानेश्वर पवार, आर. आर. बोरकर यासह सर्वसंबंधीतांनी संगनमताने निर्मिती करुन त्याव्दारे शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणातील मौजे अंचळ येथील मुख्य सुत्रधाराला अटक करण्यात यावी. तसेच आपण शासकीय कागदपत्रानुसार गट क्रमांक दाखविणाऱ्यास १० लाख रुपयाचे रोख बक्षीस देवू अशी घोषणाहर दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांनी केली आहे. निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, मौजे अंचळ येथे गट नंबर ५४/२ हा नाही. परंतु ५४/२ हा बोगस गट नंबर तयार केला आहे. सदर शेतजमिनीवर हा गट नंबरच अस्तित्वात नाही. मी अंचळ येथील दिव्यांग व अशिक्षीत शेतकरी असून अंचळ शेतशिवारात गट २४१ व शेत सर्वे ५४/२ अधिक ३ मध्ये १३ एकर ४ गुंठे मालकीची शेतजमीन आहे. मात्र भूमि अभिलेख कार्यालय रिसोड यांनी शेत सर्वे ५४/२ मधील रेकॉर्डची फिरवाफिरवी करुन शेत सर्वे ५४/४ मधील लक्ष्मण अर्जुना भंगी यांची जमीन वाढविली. या प्रकरणात आश्रु वानखेडे, सिताराम वानखेडे, तुकाराम वानखेडे, नारायण भंगी, हरिभाऊ भंगी यांच्यासह पटवारी सिताराम वानखेडे केनवड, पटवारी लोभाजी धोत्रे मानोरा, तत्कालीन तहसिलदार, तत्कालीन मंडळ अधिकारी हे सहभागी असल्याचा आरोप बाबुराव वानखेडे यांनी निवेदनाव्दारे केला आहे. तसेच पटवारी ससाने यांना जमिनीचा नकाशा सुध्दा समजत नाही. यातील सहभागी मुख्य सुत्रधाराने १० एकर जमिनीची १०० एकर कशी वाढविली याचीही चौकशी झाली पाहीजे.

या प्रकरणी माझी जमीन मला परत मिळण्यासाठी मी गेल्या बारा वर्षापासून तहसिलदार, जिल्हा भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, मुख्यमंत्री आदींना असंख्य वेळा निवेदने दिली आहेत. मात्र माझ्या निवेदनाला प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कचऱ्याची टोपली दाखविली व मला न्याय मिळाला नाही. यासदंर्भात केलेल्या उपोषणात केवळ कोरडी आश्वासने देण्यात आली. तरी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन मुख्य सुत्रधारांना अटक करण्यात यावी अशी मागणी दिव्यांग शेतकरी वानखेडे यांनी केली आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी व प्रशासनाने शासनाच्या लेखी असलेला बोगस ५४/२ हा गट नंबर दाखवून द्यावा. गट नंबर दाखवून देणाऱ्याला आपण ताबडतोब १० लाख रुपयाचे बक्षीस देवू असे आवाहन वानखेडे यांनी प्रशासनाला केले आहे. आता न्याय मिळत नसल्याने आत्मदहन करण्याचा इशारा दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांनी दिला आहे.




सेवा पंधरवाड्यात मिळेल का न्याय!
शेतकऱ्याची घोषणा : अंचळ येथील शेतजमीन प्रकरण...
गट नंबर दाखवा, ५ लाख रुपये बक्षीस मिळवा!
दिव्यांग शेतकऱ्याची कागदोपत्री जमीन चोरली!
अंचळ येथे जमीन कमी व सातबारा जास्त घोटाळा
दिव्यांग शेतकऱ्यावर १४ वर्षापासून अन्याय!

## थोडक्यात

### लोखंडी दातड्याने एकास मारहाण रिसोड पोलिसात गुन्हा दाखल !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील हराळ येथील तु मला फिरुन बोलतो का तु लय माजला का असे म्हणत एकाने शिवीगाळ करत हळद काढायचे लोखंडी दाताड्याने मारून जखमी केल्याची घटना दिनांक १७ फेब्रुवारी सकाळी रिसोड तालुक्यातील हराळ शेत शिवारात घडली याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सौरभ दिलीप वानखेडे वय २६ वर्ष रा. हराळ, ता. रिसोड, आणि रिसोड पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांच्याकडे हळद शिजविण्याचे कुकर असून ते हराळ शेत शिवारात १७ फेब्रुवारी रोजी हळद शिजवण्याचे काम करत असताना त्या ठिकाणी गावातील बाजीराव सारंगधर सरकटे रा. हराळ हे आले व हळद शिजवण्यासंदर्भात येण्यासाठी बोलत होते यादरम्यान पुन्हा ते दुपारी चार वाजता आले व वाद घातला. व लोखंडी दाताड्याने मांडीवर मारून जखमी केले. जखमी अवस्थेत त्यांना रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. याप्रकरणी रिसोड पोलिसांनी आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात' — मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा उद्या च्या संपावर बहिष्कार !

## वाशिम जिल्हा परिषद कर्मचारी संपात उतरणार नाहीत

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

राज्य सरकारी कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विश्वास काटकर यांनी घेतलेल्या एकतर्फी निर्णयामुळे कर्मचारी संघटनांमध्ये उभी फूट पडली आहे. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष करणे आणि जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चूलबुले यांना विश्वासात न घेता संपाच्या नोटिसा काढणे, या प्रकारामुळे वाशिम जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने २१ एप्रिलच्या संपावर पूर्णतः बहिष्काराचे हत्यार उपसले आहे.

राज्य कर्मचारी महासंघाने पुकारलेल्या या संपातून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक डावलले जात असल्याचा आरोप आता होऊ लागला आहे. विश्वास काटकर हे केवळ ठराविक संवर्गाचे नेतृत्व करत असून, ते जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांचा पाठपुरावा करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत, असा गंभीर ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याच नाराजीतून आता महाराष्ट्रातील जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय वाशिमच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. वाशिम जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी, प्रशासन विभाग, शिक्षक आणि सर्व संवर्गातील अधिकारी-कर्मचारी २१ एप्रिलच्या संपात सहभागी होणार नाहीत. विश्वास काटकर यांच्या कार्यपद्धतीचा निषेध करत, उमेशचंद्र चूलबुले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून हा पवित्रा घेण्यात आला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद कर्मचारी या संपाकडे पाठ फिरवून आपले काम सुरू ठेवणार असल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे वाशिम जिल्हाध्यक्ष ङविजय धुमाळेङ यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी या संपात सामील न होण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. यामध्ये लिपीक वर्गीय कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ङअमोल कापसेङ , राज्य स्तरावरील जिल्हा परिषद कर्मचारी महिला उपाध्यक्ष ङश्रीमती स्वाती वानखडेङ आणि जिल्हा संघटक ङज्ञानेश्वर (नानाभाऊ) तुर्केङ यांनी सर्व कर्मचाऱ्यांना संपात सहभागी न होण्याचे आवाहन केले आहे.या निर्णयामुळे राज्य स्तरावर मोठी खळबळ उडाली असून, कर्मचारी चळवळीतील गटबाजी आता चव्हाट्यावर आली आहे. २१ एप्रिल रोजी वाशिम जिल्ह्यात संपाचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे आता निश्चित झाले आहे.



> राज्य महासंघाचे नेतृत्व करताना विश्वास काटकर यांनी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना केराची टोपली दाखवली आहे. आमच्या राज्याध्यक्षांना (उमेशचंद्र चूलबुले) विश्वासात न घेता संपाचे राजकारण करणाऱ्यांना आम्ही साथ देणार नाही. वाशिम जिल्ह्यातील सर्व विभागातील कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिल रोजी आपल्या कर्तव्यावर हजर राहावे.
>
> **विजय धुमाळे जिल्हाध्यक्ष,** जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ वाशिम

## गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांवर भर; एचपीव्ही लसीकरण करा - जिल्हाधिकारी

### आरोग्य विषयक विविध समितींच्या सभा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील आरोग्य सेवा केवळ उपचारांपुरती मर्यादित न राहता प्रतिबंध, जनजागृती आणि गुणवत्तापूर्ण सेवांवर आधारित असावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. १५ व्या वित्त आयोगातून उपलब्ध निधीचा नियोजनबद्ध वापर करून नागरिकांच्या आरोग्य व जीवनमानात सकारात्मक बदल घडविणे हे प्रशासनाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सुकाणू समिती व १५ वा वित्त आयोग अंतर्गत डीएलसी बैठकीत विविध आरोग्य योजना, प्रतिबंधात्मक उपक्रम व विकासकामांचा आढावा घेण्यात आला.यावेळी ते बोलत होते.योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी, सद्यस्थिती आणि पुढील कार्ययोजना यावर चर्चा करण्यात आली. आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढविणे, सेवा वेळेत लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि विभागांतील समन्वय मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक लता फड,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.



## य.च.सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

येथील यशवंतराव चव्हाण सीबीएसई इंग्लिश स्कूलने दहावीच्या शैक्षणिक वर्ष २०२५,२६ च्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत१००/ टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखत अभिमानास्पद यश संपादन केले आहे.

या निकालात शिलोक बाहेती याने ९७,६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. वसिफ कलिम (९३.८ टक्के) द्वितीय, तर नंदिनी बियाणी (९३.६ टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय रेवती महाकाळ (९३,४), तन्मय सावळे (९२.४) आणि श्रेया देशमुख (९०.८) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.यंदा तब्बल ६ विद्यार्थ्यांनी ९०/टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले असून २२ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत घवघवीत यश मिळवले आहे. शाळेच्या एकूण ४८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ही शाळेसाठी अभिमानाची बाब आहे.महाराष्ट्रातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये मंगरूळपीर येथील या संस्थेने आपली उत्कृष्ट परंपरा सातत्याने टिकवून ठेवली आहे. या यशामागे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे, संस्था सचिव चंद्रकांत ठाकरे, तसेच शाळेचे प्राचार्य डॉ. संजीव कुमार सिंग यांचे मार्गदर्शन लाभले आहे.प्राचार्य डॉ. संजीव कुमार सिंग यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य घडवण्यास संस्था कटिबद्ध असल्याचे सांगितले.या यशामागे वकील खान, भूषण ठाकरे, श्रीकांत राऊत, दिपाली भोजने, राम वानखडे, स्नेहा दंडे, अक्षय इंगोले आदी शिक्षकांचे अथक परिश्रम तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचेही मोलाचे योगदान लाभले आहे.यंदाच्या निकालात मुलांनी मुलींना मागे टाकत बाजी मारली असून, मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलींपेक्षा अधिक राहिली आहे.दरम्यान, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (ण्एँ) यंदा उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल नेहमीपेक्षा सुमारे एक महिना अगोदर जाहीर केला आहे.



# जिल्हाधिकारी साहेब लावा शिस्त, कुळमेथे यांचा कारभार बेशिस्त !

## समाधान शिबिराचे नाव, वसुलीकडे धाव; गजब कारभारावर आता तरी कार्यवाही होईल का?'

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

केनवड येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज्य समाधान शिबिरात प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नागरिकांच्या समस्या जागेवर सोडवण्यासाठी आयोजित या शिबिरात अनेक ठिकाणी कर्मचारी अनुपस्थित असल्याचे दिसून आले, तर जबाबदार अधिकारी अल्पावधीतच शिबिरातून निघून गेल्याची माहिती समोर आली आहे.



शेकडो नागरिक विविध कामांसाठी शिबिरात उपस्थित होते. फेरफार, सातबारा उतारे, प्रमाणपत्रे, सामाजिक योजनांचे अर्ज अशा अनेक बाबींवर तत्काळ निर्णय अपेक्षित होता. मात्र प्रत्यक्षात अनेक टेबल रिकामे असल्याने आणि अधिकाऱ्यांची अनुपस्थिती असल्याने नागरिकांना प्रतीक्षा करावी लागली. यामुळे 'समाधान शिबिर' हा उपक्रमच नावापुरता ठरल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, शिबिर सुरू असतानाच संबंधित अधिकारी इतर ठिकाणी वाळू वाहतुकीवरील कारवाईसाठी गेले असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. त्यामुळे 'शिबिरासाठी वेळ नाही, पण इतर कारवायांसाठी वेळ कसा?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.तसेच काही वाहनधारकांनी असा आरोप केला की, वैध कागदपत्रे दाखवूनही वाहनांना काही काळ अडवण्यात आले. नंतर कागदपत्रे योग्य ठरल्यावर वाहन सोडण्यात आले, मात्र या विलंबामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.या सर्व प्रकारामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, प्रशासनाच्या प्राधान्यक्रमाबाबत शंका उपस्थित केल्या जात आहेत. याआधीही संबंधित अधिकाऱ्यांबाबत काही वादग्रस्त आरोप चर्चेत आले होते, त्यामुळे सद्य घटनेमुळे हा विषय अधिकच गंभीर बनला आहे.आता या प्रकरणात जिल्हा प्रशासनाने लक्ष घालून सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, तसेच नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी निकाली काढण्यासाठी योग्य उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

> रिसोड तहसीलमध्ये नायब तहसीलदार कुळमेथे यांच्या वर्तणुकीबाबत शेतकरी विद्यार्थी व नागरिकांकडून पुन्हा एकदा नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या मते, ही एकमेव घटना नसून यापूर्वीही उद्धट वागणूक आणि दुर्लक्ष याबाबत तक्रारी समोर आल्या आहेत.काही महिन्यांपूर्वी एका शेतकऱ्याला आत्महत्येबाबत सल्ला दिल्याचा आरोप चर्चेत आला होता. त्या पार्श्वभूमीवरच आता नव्याने घडलेल्या घटनेमुळे प्रश्न अधिकच तीव्र झाले आहेत. शासनाच्या वतीने शेतकरी व नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यासाठी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असताना, संबंधित शिबिर अर्ध्यावर सोडून जाण्याची घटना समोर आली आहे.


सिटी न्यूज वाशीम
शेतकऱ्यांचा संपला सहनशिलतेचा 'अंत'...
भ्रष्टअधिकाऱ्यांना नाही 'खंत'!
सिटी न्यूज वाशीम
'देवा' अजब तुझा न्याय, न्याय माघणाऱ्यावर अन्याय!
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
शेतकऱ्याला न्यायची आशा, नायब तहसीलदारांची चेतावणीची भाषा!
शिबिरात नाही केले समाधान, नायब तहसीलदाराचा वसुलीलाच मान!
आयोजित समाधान शिबिराला सोडले, महामार्गावर बसून वाहनाना अडविले.
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
समाधान शिबिराकडे दुर्लक्ष, जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावे लक्ष!

## २०-२२ एप्रिल दरम्यान राज्यात वादळी पावसाची शक्यता

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल.

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी:

शेतकऱ्यांनी शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत किंवा ताडपत्री/झाकणाने सुरक्षित ठेवावीत वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन मोकळ्यावर ठेवू नये.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी न.प. इमारतीमध्ये श्राध्द घालीत न.प. प्रशासनाचा केला निषेध




प्रतिनिधी २० एप्रिल

**मलकापूर :** नगर परिषदेवर निवडून आलेले नगरसेवक व लोकनियुक्त नगराध्यक्ष बसून चार महिन्यांचा कालावधी उलटला असतांनाही शहरातील नागरिकांना कोणत्याही मुलभूत सुविधा पुरविण्यात नियुक्त पदाधिकारी हे असमर्थ ठरत आहेत. शहरात साफसफाई, पिण्याच्या पाण्याची समस्या, अपंगांना देण्यात येणारा निधी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रश्न, सफाई कामगारांच्या पगाराचा प्रश्न असे अनेक प्रश्न असतांनाही न.प. प्रशासनाचा कारभार नियोजनशून्य व वेळकाढू असाच आहे. या विरोधात आज १९ एप्रिल रोजी अक्षय तृतीयेला प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपप्रमुख अजय टप यांच्या नेतृत्वात प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी न.प. ईमारतीमध्ये घागर पुजून श्राध्द घालीत न.प. प्रशासनाचा निषेध नोंदविला.

मलकापूर नगर परिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्यात प्रशासन व निवडून आलेले पदाधिकारी हे अकार्यक्षम ठरत आहेत. शहरामध्ये साफसफाईचा बोजवारा उडाला असल्याने मोठ्या प्रमाणात मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. एकीकडे साफसफाईच्या नावावर लाखो रूपये खर्च करण्यात येतात, मात्र शहरात कोठेही साफसफाई दिसत नाही. तसेच शहरामध्ये सर्वच रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. त्याचप्रमाणे पाणी पुरवठ्याचाही बोजवारा उडालेला आहे. शहर वासियांना पिण्याच्या पाण्यासाठी १५ दिवस वाट पहावी लागत आहे. केवळ न.प.च्या नियोजनशून्य कारभारामुळे शहर वासियांना नाहक विकत पाणी घ्यावे लागत आहे. दिव्यांग बांधवांकरीता ५ टक्के निधीचे वितरणही वेळेत होत नसल्याने दिव्यांग बांधवांना न.प.च्या चकरा माराव्या लागत आहे. त्याचप्रमाणे कंत्राटी साफसफाई कर्मचारी काम करतात परंतु गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून त्यांना पगारच देण्यात आले नाहीत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियावर उपासमारीची वेळ आली आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात देणी बाकी असतांनाही त्याकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष केले जात आहे.

शहरातील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही न.प. प्रशासन व निवडून आलेल्या न.प.तील पदाधिकाऱ्यांची असतांना देखील या जबाबदारीकडे दुर्लक्ष करीत आहेत. नियमानुसार न.प.तील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बायोमेट्रीक हजेरी आवश्यक असतांना अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी अद्यापही आपले बायोमेट्रीक न करता रजिष्टरमध्येच हजेरी लावत आहेत. त्यामुळे अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांना ना वेळेचे भान न कामाची जबाबदारी असेच चित्र निर्माण झाले आहे. आज चार महिने उलटून गेले असतांनाही शहरातील जनतेला कोणत्याही ठोस अशा मुलभूत सुविधा पुरविण्यावर भर देण्यात आला नाही. निवडणुकीवेळी अनेक आश्वासने देण्यात आली, मात्र ही आश्वासने आजरोजी हवेतच विरल्याचे दिसत आहे. अशा नियोजनशून्य कारभाराचा निषेध नोंदविण्यासाठी आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने चक्क न.प.च्या प्रशासकीय ईमारतीमध्येच अक्षयतृतीयेच्या दिवशी घागर पुजून श्राध्द घालीत न.प. प्रशासनाचा व न.प.तील सत्ताधारी व पदाधिकाऱ्यांचा निषेध नोंदविला. तसेच एक महिन्याच्या आत शहर वासियांना आवश्यक त्या मुलभूत सुविधा न पुरविल्यास याहीपेक्षा तीव्र असे आंदोलन छेडू असा इशाराही उपस्थित पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपप्रमुख अजय टप, शहराध्यक्ष शालीकराम पाटील, तालुकाध्यक्ष राहुल तायडे, बलराम बावस्कर, दिव्यांग संघटनेचे निलेश चोपडे, नागेश सुरंगे, प्रहार दिव्यांग शहर प्रमुख अनिल गोठी, संजय इंगळे, करण नायसे राजू पुणेकर यासह आदी उपस्थित होते.

> ◆ मलकापूर न.प. प्रशासन व निवडून आलेले पदाधिकारी हे शहरातील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्यात असमर्थ ठरत आहेत. याबाबत अनेकदा निवेदने, तक्रारी करण्यात आल्यात. मात्र कोणतीही ठोस अशी उपाययोजना आजपर्यंतही झाली नाही. स्वच्छतेचा उडालेला बोजवारा, पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न यासह अनेक प्रश्न हे आ वासून उभे असतांनाही ते सोडविण्याकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष केले जात आहे. या विरोधात आम्ही लवकरच न्यायालयात न.प. मध्ये स्थापन असलेली बॉडी बरखास्त करण्यासाठी याचिका दाखल करणार आहोत.
>
> - **अजय टप,** जिल्हा उपप्रमुख प्रहार जनशक्ती पक्ष मलकापूर

# जबरी चोरी प्रकरण उघड ३ आरोपींना अटक

प्रतिनिधी २० एप्रिल

**देऊळगाव राजा :** पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन अंढेरा हद्दीत घडलेल्या बायगाव बुद्रुक येथील गंभीर जबरी चोरी प्रकरणात पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मुद्देमाल जप्त करून तीन आरोपींना अटक केली आहे. सदर गुन्ह्यात गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढत त्यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींकडून सोन्याची लगडी (वजन ७८.५७० ग्रॅम किंमत अंदाजे ४,७७,००० रुपये) असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पो. स्टे. अंढेरा येथे अप क्र. ८१/२०२६ नुसार कलम ३०९ (६), ३३३, १२७(२), ३(५) बीएनएस अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींमध्ये रवी प्रदीप पवार (वय २१, रा. मोटेगाव, ता. रिसोड, जि. वाशिम), निलेश उर्फ ईलेश जगन शिंदे (वय २५, रा. धानोरी, ता. चिखली, जि. बुलडाणा), उमेश जगन शिंदे (वय २३, रा. धानोरी, ता. चिखली, जि.बुलडाणा यांचा समावेश आहे. या चोरीत सोन्याचे दागिने - ७७ग्रॅम (४,७७,०००), चांदीचे दागिने -८० ग्रॅम (१०,४००) रोख रक्कम -५१,००० एकूण नुकसान ५,३८,४०० जप्त / मिळालेला मुद्देमाल सोन्याची लगडी ७८.५७० ग्रॅम (४,७७,०००) मोटारसायकल (एमएच ३७ वाय ९३४७) - अंदाजे ३५,००० रूपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या कारवाईत एपीआय शक्करगे, दिनेश घुगे (तपास अधिकारी), एचसी सिद्धार्थ सोनकांबळे, पीसी नितीन फुसे व पीसी किशोर जाधव यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांच्या मागणीला यश

प्रतिनिधी २० एप्रिल



**खामगांव :** मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले उज्वला गॅस योजनेअंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील लाभार्थ्यांना त्वरित उज्वला गॅस योजनेअंतर्गत नवीन कलेक्शन मिळावे याकरिता राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी थेट प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दिनांक ३/१०/२०२५ रोजी पत्र लिहून जिल्ह्यातील प्रलंबित असलेल्या उज्वला गॅस योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना त्वरित गॅस कनेक्शन मिळावे अशी अशी मागणी निवेदनाद्वारे केली होती. तसेच संबंधित सर्व विभागाला आपल्याकडून आदेश देण्यात यावे यासंदर्भात वरिष्ठ पातळीवर पात्र व्यवहार करून उज्वला गॅस योजनेच्या प्रलंबितलाभार्थ्यांना महत्त्वाच्या मुद्द्याकडे प्रधानमंत्री लक्ष केंद्रित केले. या पत्राची दखल घेतली प्रधानमंत्री कार्यालय अंतर्गत थेट बुलढाणा जिल्ह्याचे निरीक्षक यांना बुलढाणा जिल्हा करता १६ हजार १७७ नवीन कनेक्शन प्राप्त झाले आहेत.त्यामुळे अनेक गरीब कुटुंबांचे उज्वला गॅस योजनेअंतर्गत आरक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण झाले असून लवकरात संबंधित सर्व लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत गॅस सिलेंडरचे वितरन करण्यात येणार आहे. यापूर्वी सुद्धा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजना पीएम स्वनिधी योजना तसेच लाडली बहन योजना अशा अनेक योजनांसाठी सातत्याने पाठपुरावा व आंदोलने करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला व कल्याणकारी योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहे. एखांदी सामाजिक संघटना ही कुशल नेतृत्वाच्या आधारे जनसामान्यांना न्याय मिळवून देऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे नागरिकाकडून बोलल्या जात आहे. उज्वला गॅस योजनेच्या लाभार्थ्यांनी संबंधित एजन्सीकडे आधार कार्ड घेऊन जाऊन आपले गॅस कनेक्शन मिळून घ्यावे असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी केले आहे.

# शेगावातील गेस्ट हाऊसमध्ये नाशिकच्या युवकाची आत्महत्या

प्रतिनिधी २० एप्रिल

**शेगाव :** शहरातील अंबिका माता देवी मंदिरासमोरील गेस्ट हाऊसमधील खोलीत नाशिक शहरातील एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दुपारी घडली. याप्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृतकाचे नाव प्रीतम राजेंद्र कुलकर्णी (रा. प्लॉट क्र. १, राजकमल हाऊसिंग सोसायटी, कामटवाडा रोड, दुर्गानगर, त्रिमूर्ती चौक, नाशिक) असे आहे.

याप्रकरणी कमलेश कैलाश शर्मा (रा. रोकडियानगर, शेगाव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १७ एप्रिल रोजी दुपारी २ ते २:४५ वाजताच्या दरम्यान गेस्ट हाऊसच्या रूम क्रमांक १०३ मध्ये दोन युवक थांबले होते. काही वेळानंतर खोलीतून आरडाओरडा ऐकू आल्याने लॉज व्यवस्थापनाला माहिती देण्यात आली. कमलेश शर्मा घटनास्थळी पोहोचले असता, खोलीचा दरवाजा उघडा होता. आत एक युवक ओरडत होता, तर दुसरा युवक बेशुद्धावस्थेत आढळून आला. आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. आरडाओरडा करणाऱ्या युवकाने नाव नितीन गोरख सावळे, असे सांगत बेशुद्धावस्थेतील व्यक्ती प्रीतम कुलकर्णी असल्याचे सांगितले. प्रीतमने गळफास घेतला, अशी माहिती त्याने दिली. यानंतर तत्काळ शेगाव शहर पोलिस ठाण्यात घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# जलव्यवस्थापन काळाची गरज ; सुरुवात स्वत : पासून करा – डॉ. देवरे

## ◆ जिल्हा नियोजन सभागृहात 'जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्या'चे उद्घाटन

प्रतिनिधी २० एप्रिल

**बुलढाणा :** जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्या'चा शुभारंभस्थानिक जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जलव्यवस्थापन ही आजच्या काळाची अनिवार्य गरज असून, पाण्याचा काटकसरीने वापर आणि व्यवस्थापनाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे होते. यावेळी पाटबंधारे प्रकल्प

मंडळाचे अधीक्षक अभियंता बापूसाहेब गाडे, जिगाव प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता श्रीराम हजारे, जलयुक्त शिवार अभियानाचे तज्ज्ञ सदस्य रामकृष्ण पाटील, तसेच कार्यकारी अभियंता सुनील बोरले, शरद नागरे, परमजितसिंग जुनेजा, तुषार मेतकर, प्रवीण चावरे आणिसपना डावरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व आद्य अभियंता सर एम. विश्वेश्वरैया यांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. विशेष म्हणजे, बुलढाणा जिल्ह्याची भाग्यरेखा ठरलेल्या पूर्णा, खडकपूर्णा, ज्ञानगंगा, नळगंगा व पैनगंगा या नद्यांच्या जलकलशाचे पूजन करून जिल्ह्याच्या जलसमृद्धीचा जागर करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मंजीतसिंग राजपूत यांनी तर आभार प्रदर्शन उपविभागीय अभियंता अंकित चौथनकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक अभियंता काजल जाधव, निलेश उबाळे, शरद भारोटे, केशव जवादे यांच्यासह जलसंपदा विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप उपस्थित सर्वांनी घेतलेल्या 'जलप्रतिज्ञेने' करण्यात आला.जिल्हाधिकारी डॉ. देवरे पुढे म्हणाले की, नागरिकांमध्ये जलसाक्षरता वाढवणे आणि पाण्याच्या थेंबाथेंबाचे महत्त्व पटवून देणे हा या पंधरवाड्याचा मुख्य उद्देश आहे. जलव्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबविल्यास भविष्यातील पाणी संकट टाळता येईल. यावेळी रामकृष्ण पाटील, शरद नागरे, बापूसाहेब गाडे आणि श्रीराम हजारे यांनीही जलव्यवस्थापन व सिंचन विषयावर आपले विचार मांडले. या पंधरवाड्यामध्ये शेतकरी पाणीवापर संस्थांशी संवाद, धरण व कालवा स्वच्छता अभियान, नदी प्रदूषण नियंत्रण व पांदण रस्ता दुरुस्ती, उ उपसा सिंचन तक्रारींचे निरसन व आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन यांसारखे विविध लोकउपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत. सौ. सुरेखा जाधव यांनी प्रास्ताविक केले व जलगीत सादर केले.

# अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर जप्त

## ◆ तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांची कारवाई



प्रतिनिधी २० एप्रिल

**देऊळगाव राजा :** तालुक्यात सुरू असलेल्या वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने पुन्हा एकदा कडक भूमिका घेत १८ एप्रिल रोजी सकाळी ६:३० वाजता टाकरखेड भागिले येथे धडक कारवाई केली. तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाई दरम्यान अवैधरित्या रेती वाहतूक करणारा एक टिप्पर पकडण्यात आला. संबंधित टिप्परमध्ये अंदाजे पाच ब्रास रेती असल्याचे आढळून आले असून, वाहन तात्काळ जप्त करण्यात आले.जप्त केलेला टिप्पर पुढील कायदेशीर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत

पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथे अटकाव करण्यात आला आहे. या

कारवाईमुळे परिसरात अवैध रेती करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.कारवाईवेळी महसूल पथकातील कर्मचारी कविता खरात व विठ्ठल हरणे हे उपस्थित होते. यावेळी तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांनी तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात अशाच प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगितले.प्रशासनाच्या या कडक भूमिकेमुळे अवैध व्यवसायांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट — संमिश्र

# वडाळी देशमुखला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने धम्मदेशना व प्रवचन

**कार्यक्रमाला बौध्द समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती**

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोट** : वडाळी देशमुख येथे १४ एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने करूना बुद्ध विहारांमध्ये पूज्य भन्तिजी यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीला दीप प्रज्वलित करून त्रिशरण पंचशील उपस्थित असलेल्या जनसमुदायाला त्रिशरण पंचशील दिले, वाहूरवाघ परिवारातील निलेश वाहूरवाघ हा श्रीनगर येथे सी आय एस एफ पोलीस मध्ये कार्यरत असून त्यांचा समाजासाठी भोजनदानाचा संकल्प केला होता त्यांनी तो आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने मिष्ठान्न अन्नदान करून पूर्णत्वास आणला दि. १३ पूज्य भंतेजी यांचे स्वागत समारंभ समाज बांधवाकडून स्वागत केले प्रवचनाला व्यासपीठावर सुरुवात करण्यात आली यावेळी उपाशीका व उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंचवर्गीय भिक्षु भोजनदान देण्यात आले , करुणा बुद्ध विहार प्रणांगणामध्ये गावातील व पंचक्रोशीतील उपासक व उपाशीकांसाठी विशेष पेंडॉलची व्यवस्था होती कार्यक्रमाला प्रमुख पूज्य भन्तेजी विजय कीर्ती, पूज्य भंतेजी



सूर्यकीर्तीजी अकोला, पूज्य भन्तेजी नंदघोष अमरावती

आणि ज्योती पुत्रजी तेल्हारा पूज्य भंतेजी आर्याजी शील रक्षीता हे या पाच पंचवर्गीय भंतेजी यांची उपस्थिती मध्ये संपन्न झाले. रणांगणात ग्राम साफसफाई भव्य दिव्य रांगोळ्या मंदिरावर व मुर्त्या रंग रंगोटी विशेष आकर्षण विद्युत रोषणाई सजवलेल्या रथावर बाबासाहेबांची फोटो प्रतिमा विराजमान करून समाज बांधवांनी मिरवणुकीमध्ये महिलांचे भीम गीते व बहारदार नृत्य करत मिरवणुकीचा आनंद घेतला बुद्धवासी पुष्पाबाई समाधानजी यांच्या स्मृती पिथेर्थ विलास समाधानजी वाहूरवाघ यांच्याकडून ६ सिमेंट बेंच बसवण्या साठी सप्रेम भेट दिल्या त्यांचा परिवारासहित समाजबांधवाकडून फुलपुष्प श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला प्रास्ताविका प्रकाश वाहूरवाल यांनी केली, व प्रमुख मार्गदर्शन बोदाचार्य चंद्रमणीजी ढोके मंगरूळ कांबे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन सर्वधर्मसमभाव स्वच्छता अभियान व तरुण पिढीला व्यसनमुक्तीचा संदेश देऊन यथोचित प्रबोधन आभार प्रदर्शन केले पूज्य भन्तिजी महानाम अकोला यांच्या भंतेजी साठी सहकार्य लाभले, यावेळी भोजनदानाचा हजारो उपासक व उपासीका यांनी लाभ घेतला या यावेळी क्रांतीरत्न कला क्रीडा बहुउद्देशीय मंडळ, यशोधरा महिला मंडळ व समता सैनिक दल यांचे मोलाचे सहकार्य लाभले,



# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# भेंडवळ घटमांडणीचे भाकित

◆ पिके दमदार पण अतिवृष्टी अन् रोगराईचा फास

◆ देशाच्या संरक्षण व्यवस्थेवर ताण येणार, राजा कायम



प्रतिनिधी २० एप्रिल

**जळगाव जामोद (बुलढाणा) :** अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील भेंडवळ येथील ३७० वर्षांची परंपरा लाभलेल्या घटमांडणीचे भाकीत सोमवारी पहाटे जाहीर करण्यात आले. यंदा पिकांची स्थिती चांगली असली तरी, अतिवृष्टी, महापूर आणि रोगराईमुळे पिकांच्या मोठ्या प्रमाणावर नासाडीची भीती वर्तवण्यात आली आहे. चंद्रभान महाराजांचे वंशज पुंजाजी महाराज वाघ आणि सारंगधर महाराज वाघ यांनी हे भाकीत वर्तवले.

## यंदाच्या पावसाळ्याबाबत भाकीत

◆ पावसाचा अंदाजः ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये 'अतिवृष्टीचा कहर'

जूनः पावसाचे प्रमाण कमी राहील.

जुलैः पावसाचा जोर वाढेल.

ऑगस्ट आणि सप्टेंबरः या दोन महिन्यांत अतिवृष्टी आणि महापुराची परिस्थिती निर्माण होईल.

या पावसामुळे पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांच्या हाती आलेला घास हिरावला जाण्याची शक्यता आहे.

## पीकपाणी चांगले, पण नासाडीची टांगती तलवार

◆ यंदा घागरीवरील पुरी गायब आढळल्याने पृथ्वीवर मोठ्या संकटाचे संकेत देण्यात आले आहेत. शेतीबाबतचे मुख्य निष्कर्ष असे आहे की, पिके भरपूर येतील, चारा आणि पाण्याची उपलब्धता चांगली राहील. शेतमालाला समाधानकारक भाव मिळतील. अतिवृष्टी आणि रोगराईमुळे पिकांची अतोनात नासाडी होईल, ज्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होऊन ती काही प्रमाणात कमकुवत होऊ शकते.

## 'राजा' कायम, मात्र सीमांवर तणाव

◆ राजकीय भाकितानुसार, देशाच्या सत्तास्थानी असलेले नेतृत्व (राजा) कायम राहील, असे संकेत मिळाले आहेत. मात्र, शत्रू राष्ट्रांकडून होणारा त्रास आणि नैसर्गिक आपत्तींमुळे देशाच्या संरक्षण खात्यावर मोठा ताण येणार आहे. आर्थिक आघाडीवरही मोठे चढ-उतार पाहायला मिळतील.

## ३७० वर्षांची परंपरा आणि शेतकऱ्यांचा विश्वास

◆ हवामान विभागाचे आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असतानाही, साडेतीनशे वर्षांहून अधिक जुन्या असलेल्या या परंपरेवर शेतकऱ्यांचा दृढ विश्वास आजही कायम आहे. हे भाकीत ऐकण्यासाठी विदर्भ, खान्देश, मराठवाडा आणि शेजारील मध्य प्रदेशातून हजारो शेतकरी, कृषी कंपन्यांचे प्रतिनिधी आणि व्यावसायिक जळगाव जामोद तालुक्यात दाखल झाले होते.

## कोणती पिके जोमात येणार?

◆ पिकांचा विचार करता, यावर्षी तूर, हरभरा आणि गहू या पिकांसाठी वातावरण अत्यंत पोषक राहील. कडधान्यांचे उत्पादन चांगले झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. तसेच कापसाचे पीक यंदा समाधानकारक राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मात्र, अवकाळी पावसाचे सावट वर्षभर राहणार असल्याने काढणीला आलेल्या पिकांची काळजी घ्यावी लागणार आहे.

## पावसाचे स्वरूप आणि पेरणीची गणिते

◆ पंचांगानुसार, पावसाळ्याच्या सुरुवातीला म्हणजे पहिल्या महिन्यात पावसाची ओढ राहण्याची शक्यता आहे. सार्वत्रिक पाऊस नसल्याने पेरण्यांना विलंब होऊ शकतो. मात्र, दुसऱ्या महिन्यात पावसाचा जोर वाढल्याने रखडलेल्या पेरण्या पूर्ण होतील. चिंतेची बाब म्हणजे तिसऱ्या आणि चौथ्या महिन्यात पावसाचे प्रमाण गरजेपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. यामुळे अतिवृष्टी होऊन नदीकाठच्या जमिनी खरडून जाणे किंवा उभ्या पिकांचे नुकसान होण्याचा धोका आहे.

## आर्थिक स्थिती आणि जागतिक पडसाद

◆ केवळ शेतीच नव्हे, तर देशाच्या आर्थिक स्थितीवरही पंचांगकर्त्यांनी भाष्य केले आहे. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम जाणवेल. महागाई वाढण्याची शक्यता असून आर्थिक गणितं जुळवताना सर्वसामान्यांची ओढाताण होऊ शकते. मात्र, भारताचे संरक्षण धोरण आणि लष्करी सामर्थ्य या काळात अधिक मजबूत होईल, असे संकेत पंचांगातून देण्यात आले आहेत.

## 'हे शास्त्र आहे, थोतांड नाही' - टीकाकारांना उत्तर

◆ ज्योतिष आणि पंचांगाला 'अंधश्रद्धा' म्हणणाऱ्या टीकाकारांचा पंचांगकर्त्यांनी खरपूस समाचार घेतला. 'पंचांग हे गणितावर आधारित वैदिक शास्त्र आहे. आम्ही कोणावरही आमची मते लादत नाही. ज्यांची श्रद्धा आहे, त्यांनी यातील सूचनांचा लाभ घ्यावा,' असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या चुकीच्या मंत्रतंत्राचा आणि 'बुवाबाजी'चा त्यांनी जाहीर निषेध केला, व आम्ही केवळ खगोलशास्त्रीय गणितांच्या आधारे अंदाज वर्तवतो, असे समर्थन दिले.

# रविवारी रात्री वातावरणात अचानक बदल

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला :** एकीकडे तापमान वाढत असताना रविवारी रात्री सोसाट्याचे वारे, विजांचा लखलखाट आणि ढगांचा गडगडाट झाला. अकोला शहरात तसेच जिल्ह्यात काही भागात पाऊस झाला. वातावरणातील बदलामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. झाडावर सध्या कैऱ्या आहेत. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे झाडांवरील कैऱ्या पडल्या. तसेच शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात विद्युत पुरवठा देखील खंडीत झाला होता. हा प्रकार वारंवार होत असल्यामुळे ऐन उन्हाळ्यात नागरिकांचा जीव कासावीस होतो. याकडे महावितरणने लक्ष देणे आवश्यक आहे.

# अज्ञात व्यक्तींकडून बांबूच्या झाडांची चोरी

◆ जिल्ह्यातील पैलपाडा कंपार्टमेंट मधील प्रकार

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला :** पैलपाडा गावाजवळच्या कंपार्टमेंटमध्ये लावण्यात आलेले बांबूची झाडे अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. इतकेच नाही तर या ठिकाणी पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने बांबूच्या खोडांना आग लावल्याची घटना उघडकीस आली. वन विभागाने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

अकोला जिल्हयातील वन विभागाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याचे चित्र आहे. या बाबीकडे वन विभाग का डोळेझाक करीत आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. वन विभागाच्या अखत्यारीत येत असलेल्या पैलपाडा गावाचा कंपार्टमेंट क्रमांक सी.एन. बी१३९ सर्वेक्षण नं. ११९ मध्ये लागवड केलेल्या बांबूच्या झाडांची अवैधरित्या तोड करून बांबू लंपास केल्याचा प्रकार समोर आला आहे, एवढेच नाहीतर बांबूचे झाडे तोडल्यानंतर त्याच्या खोडांना आग लावून पुरावे नष्ट करण्याचा प्रकार सुद्धा या ठिकाणी घडल्याचे दिसून येत आहे. सदरचा प्रकाराचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात वायर होत असून याकडे अकोला वन विभाग का दुर्लक्ष करीत आहे असा प्रश्न निर्माण होत आहे. यामध्ये दोषी असलेल्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे. एकीकडे शासन वृक्ष लागवडीला प्राधान्य देत आहे, तर दुसरीकडे अकोला जिल्ह्यातील जंगलाचा भाग हा सुरक्षित नसल्याचे दिसून येत आहे. वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी निसर्गप्रेमीन करून करण्यात येत आहे.

# शहरात युवा बुलेट चालकांची मनमानी पुन्हा सुरू

◆ सायलेन्सर टँपर करून फटाके फोडून ध्वनी प्रदूषण

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला :** शहरात बुलेटचे फटाके फोडण्याचे फॅड पुन्हा आलेले दिसते. बुलेटचे सायलेन्सर टँपर करून युवक फटाके फोडतात. यामुळे ध्वनी प्रदूषण होते तसेच नागरिकांना आपण विनाकारण त्रास देतो, याचे भान राहिले नाही. स्वतः च्या मस्तीत संबंधित वाहन चालवताना दिसतात. परंतु त्यांची मनमानी रोखणे आवश्यक आहे.

फटाके फोडणा-या बुलेट चालकांवर वाहतूक शाखेने मागे कारवाई केली होती. असे सायलेन्सर जप्त करून त्यांना बुलडोझर खाली दिले होते. परंतु आता पुन्हा नव्याने कारवाई करण्याची गरज आहे. त्याशिवाय हे प्रकार थांबणार नाही. अशी वाहने टार्गेट करून त्या चालकांवर कडक कारवाई करण्याची वेळ आली आहे. मागे झाली तशीच कारवाई केली तरच मनमानीला आळा बसेल अन्यथा नाही.

# शास्त्री स्टेडियम मधील बंद पोलिस चौकी बनली दारूड्यांचा अड्डा

◆ गैरवापराकडे प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष

प्रतिनिधी २० एप्रिल




**अकोला :** अकोल्याच्या रामदासपेठ पोलिस स्टेशन अंतर्गत शास्त्री स्टेडियम मध्ये पोलिस चौकी बनवली होती. परंतु बंद पोलिस चौकीचा दारूड्यांनी अड्डा बनवलेला दिसतो. या ठिकाणी दारूच्या रिकाम्या बाटल्या तसेच घाण दिसते. येथे सीसीटीवी कॅमेरे बसवण्यात आले आहे. परंतु तरीही रिकामटेकडे चुकीच्या कामासाठी या जागेचा वापर करताना दिसतात.

शास्त्री स्टेडियम मध्ये सुरू असलेल्या नियमबाह्य कामांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे. प्रशासनाने पुढाकार घेऊन गैरप्रकार थांबवावे तसेच दारूड्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी मोठ्या प्रमाणात केली जात आहे. सार्वजनिक स्थळांचा वापर गैर कामासाठी होऊ नये. कारण आजुबाजूच्या लोकांना देखील त्यामुळे त्रास होतो ही जन भावना आहे. तातडीने कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# महावितरण तार चोरी प्रकरणात आरोपी गजाआड



प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला :** अकोट फाईल पोलिसांनी महावितरण विद्युत तार चोरी प्रकरणात दोन आरोपींना अटक केली. सुमारे १ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपींना अटक करून ३ दिवसांची पोलीस कोठडी घेण्यात आली.

९ एप्रिल रोजी प्रदीप रामदास खैरे सहायक अभियंता, आपातापा वीज वितरण केंद्र यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २४ डिसेंबर २०२५ ते ३ एप्रिल २०२६ दरम्यान घुसर शेतशिवार तसेच खानापूर, उगवा रोड परिसरातून अज्ञात आरोपींनी विद्युत तार व रोहीत्र असा एकूण २ लाख ८३ हजार ५२५ रुपयांचा मुद्देमाल चोरी केला होता. तसेच सिमेंटचे पोल तोडून सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान केले होते. या तक्रारीवरून अकोट फाईल पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास करताना विशेष पथके तयार करून तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयित आरोपी सुरज गजानन वाघ (२५) व संकेत सुधाकर वाघ (२०) दोन्ही रा. खडका, तालुका अकोला यांना ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान आरोपींनी ग्रामीण भागातील बंद पडलेल्या वीज पुरवठ्याच्या ॲल्युमिनियम तार चोरी केल्याची कबुली दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरिक्षक शेख रहीम, अनिस पठाण, प्रशांत इंगळे, हर्षल श्रीवास, योगेश काटकर, संतोष चिंचोळकर, इमरान शाह, लिलाधर खंडारे, अमिर व गिरीश तिडके यांच्या पथकाने केली. आरोपींनी चोरी केलेला सुमारे २०० किलो तार विकल्याचे अंदाजे ९० किलो तार घुसर परिसरात लपवून ठेवल्याचे सांगितले.



रविवारी रात्री सोसाट्याचे वारे वाहू लागले. विजांचा कडकडाट झाला. आणि त्यात आकाशातील निसर्गाचे विलोभनीय आणि थरारक दृश्य टिपले डॉ. संजय खडक्कार यांनी...

# हजूर साहिब नांदेड – आसनसोल दरम्यान विशेष रेल्वेगाडी

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला :** उन्हाळ्याच्या सुट्ट्यांदरम्यान प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त प्रवासी भार कमी करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभागामार्फत हजूर साहिब नांदेड – आसनसोल दरम्यान उन्हाळी विशेष रेल्वेगाडी चालविण्यात येणार आहे.

गाडी क्रमांक ०७७०१ हजूर साहिब नांदेड – आसनसोल विशेष ही गाडी दि. २१ एप्रिल २०२६ (मंगळवार) रोजी हजूर साहिब नांदेड (२३:५० वाजता) येथून सुटेल व आसनसोल (१२:०० वाजता) येथे गुरुवारी पोहोचेल.

ही गाडी मार्गातील खालील स्थानकांवर थांबेल :

पूर्णा (०२:२० वाजता), हिंगोली (०३:५२ वाजता), वाशिम (०४:५२ वाजता), अकोला (०६:५० वाजता), बडनेरा (०८:३२ वाजता), नागपूर (१२:१० वाजता), गोंदिया (१४:१५ वाजता), दुर्ग (१६:३५ वाजता), रायपूर (१७:३० वाजता), बिलासपूर (१९:४५ वाजता), झारसुगुडा (२३:३५ वाजता), राऊरकेला (०१:५५ वाजता), टाटानगर (०७:२० वाजता), चांदिल (०८:३२ वाजता) आणि पुरुलिया (०९:४२ वाजता).

परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक ०७७०२ आसनसोल – हजूर साहिब नांदेड विशेष ही गाडी दि. २३ एप्रिल २०२६ (गुरुवार) रोजी आसनसोल (१४:०० वाजता) येथून सुटेल व हजूर साहिब नांदेड (००:४५ वाजता) येथे शनिवारी पोहोचेल.

परतीच्या प्रवासात गाडी आसनसोल (१४:०० वाजता) येथून सुटून पुरुलिया (१६:०२ वाजता), चांदिल (१७:०२ वाजता), टाटानगर (१८:३० वाजता), राऊरकेला (२२:३५ वाजता), झारसुगुडा (००:३५ वाजता), बिलासपूर (०४:१५ वाजता), रायपूर (०६:०२ वाजता), दुर्ग (०६:५५ वाजता), गोंदिया (०९:१५ वाजता), नागपूर (११:३५ वाजता), बडनेरा (१५:०५ वाजता), अकोला (१८:३० वाजता), वाशिम (१९:५२ वाजता), हिंगोली (२०:५२ वाजता) आणि पूर्णा (२२:५० वाजता) येथे थांबून हजूर साहिब नांदेड (००:४५ वाजता) येथे पोहोचेल.

या गाडीमध्ये एकूण २४ डबे असतील. त्यामध्ये ०२ एसी टू टियर, ०६ एसी थ्री टियर, १० स्लीपर क्लास, ०४ जनरल सेकंड क्लास आणि ०२ एसएलआर डबे असतील.

प्रवाशांनी या विशेष रेल्वेगाडीचा लाभ घ्यावा व प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करून नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# चार्टर्ड अकॅडमीमध्ये 10 वी नंतर कॉमर्समधील करिअर संधींवर विशेष सेमिनार आयोजित

प्रतिनिधी २० एप्रिल

**अकोला :** १८ एप्रिल रोजी चार्टर्ड अकॅडमीद्वारे मागील शनिवारी १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'कॉमर्समध्ये करिअरची निवड कशी करावी' या विषयावर एका भव्य सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. बोर्डाच्या परीक्षेनंतर करिअर निवडीबाबत संभ्रमात असलेल्या विद्यार्थी आणि पालकांना योग्य दिशा दाखवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या मुख्य वक्त्या सीए सपना भिरड यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, कॉमर्स क्षेत्रात अनेक करिअरचे पर्याय उपलब्ध आहेत. त्यांनी प्रामुख्याने सीए, सीएस आणि एसीसीए यांसोबतच कॉमर्स क्षेत्रात वाढणाऱ्या नोकरीच्या संधींबद्दल सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून प्रा. प्रकाश डवले सर यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. डवले यांनी कॉमर्स क्षेत्राचे महत्त्व समजावून सांगताना विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन केले. त्यांनी नमूद केले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशेने आपले करिअर घडवण्यास मोठी मदत मिळते.




या सेमिनारमध्ये चार्टर्ड अकॅडमीचे सहयोगी ॲड. अनिकेत शुक्ला सर यांनी सीएस आणि एसीसीए बद्दल माहिती दिली आणि भविष्यातील या कोर्सेसचे वाढते महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, प्रत्येक विद्यार्थी आपली आवड आणि क्षमता ओळखून कॉमर्स क्षेत्रात एक यशस्वी करिअर घडवू शकतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. दीपिका बियाणी यांनी केले. या सेमिनारचा शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी आणि पालकांनी लाभ घेतला. उपस्थितांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत फायदेशीर असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तराचे सत्रही घेण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे विषय आणि करिअरशी संबंधित प्रश्न विचारले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सीए सपना भिरड यांनी चार्टर्ड अकॅडमीबद्दल माहिती दिली. ज्या विद्यार्थी आणि पालकांना या सेमिनारला उपस्थित राहता आले नाही, त्यांच्यासाठी अकॅडमीत 'स्पेशल फ्री करिअर समुपदेशन' आयोजित करण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थी अपॉइंटमेंट बुक करून या संधीचा लाभ घेऊ शकतात. यासाठी चार्टर्ड अकॅडमी, गोरक्षण रोड, अकोला येथे ९०७५ ३५५३९९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK